विधानें

(१) बुद्धीचा मना । जीवना–वर परिणाम होतो.

(२) कष्टाच्या कामाची । किंमतीची मागणी का करु नये ?

(३) वायकोला स्वत:पुढें नवऱ्यांचें । इतरांचें भान नसतें बरें.

(४) पोट । दुःख साऱ्यांच्याच पाठीमागें आहे, पण कर्तव्य करायला पाहिजे !

(५) स्त्री-पुरुषांच्या सहवासांत। संसारांत काहीं सुख नसतें बरें.

(६) लबाडी । मस्करी करण्याच्या भरांत मनुष्याच्या मनाचा तोल सुटून कोठपर्यंत जाईल, हें सांगवत नाहीं.

(७) जीवनांत संगतीपेक्षां विसंगतीचेंच रण । रान माजलेलें आढळतें.

(८) पैसा नसला कीं पोटांत तुटतें आणि पैसा वापरला । मिळाला तर पोट फुगतें.

(९) जितकी जाणीव । उणीव जास्त तितकें दुःख अधिक !

(१०) यश । नियति ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे.

(११) सुबत्तेच्या । सुखाच्या, काळांत मनुष्य अहंकारानें, उन्मत्तपणानें वागतो.

(१२) बायकोला फार सत्यकथन। ताडण करूं नये. थोडेसें करावें.

(१३) विचारी । बिलराळ । कन–
वाळूंशी देवपरत्वे यतीच म्हणी...

अखरची तारी...

अधिकृत उत्तर :

शब्दरजन स्पर्धा क्र. ...
प्रवेश–फी प्रत्येक चौको...

... प्रवे...

[illegible]			
१.	मना-	जीवना-	
2	कामाची	किंमतीची	
3	नवऱ्याचे	इतरांचे	
४	पोट	दुःख	
५	सहवासांत	संसारांत	
६	लबाडी	मस्करी	
७	रण	रान	
८	वापरला	मिळाला	
९	जाणीव	उणीव	
१०	यश	नियति	
११	सुबत्तेच्या	सुखाच्या	
१२	सत्यकथन	ताडण	
१३	विचारी	बिलराळ	[illegible]
१४	राग	शब्द	[illegible]
१५	[illegible]	[illegible]	[illegible]
१६	[illegible]	[illegible]	[illegible]

हा स्पर्धेत भाग...
अटी मला मान्य असून ...
अखेरचा निर्णय मी मान...

२०४
...सो. पुणें

सोद...
गोस्ट...
शब्द...

सांप्रदायिक ज्ञानेश्वरी शिक्षण माला पुस्तक २ रें

सान्वय व सार्थ

श्रीज्ञानेश्वरी अध्याय बारावा

जयजय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे ।
अनवरत आनंदें । वर्षतिये ॥ १ ॥

अन्वय—वो (गुरुकृपादृष्टी) शुद्धे, प्रसिद्धे उदारे, अनवरत आनंदें वर्षतिये[1], (तूं) जयजय[2].

अर्थ—हे (श्रीगुरुकृपादृष्टिमाउली) निर्मळ, प्रख्यात उदार, (व) अखंड आनंदाचा (शब्दशः—आनंदानें) वर्षाव[1] करणाऱ्या[1] (अशा तुझा) जयजयकार[2] असो.[2]

विषयव्याळें मिठी । दिधलिया नुठी ताठी ।
तें तुझेनि गुरुकृपादृष्टी । निर्विष होय ॥२॥

अन्वय—(हे) गुरुकृपादृष्टी, विषयव्याळें[1] मिठी दिधलिया[2] ताठी नुठी[3], ते (मिठी) तुझेनि निर्विष होय.

अर्थ—(हे) श्रीगुरुकृपादृष्टिमाउली, विषयरूपी[1] सर्पानें[1] दंश केला[2] असतांना[2] (येणारी) मूर्च्छा नाहींशी[3] होत[3] नाही[3]; तो (मूर्च्छा आणणारा दंश) तुझ्यांमुळें विषरहित होतो.

तरि कवणातें तापु पोळी । कैसेनि वो शोकु जाळी ।
जरि प्रसादरसकल्लोळीं । पूरें येसि तूं ॥३॥

अन्वय—वो, जरी तूं प्रसादरसकल्लोळीं[1] पुरें येसि, तरि कवणातें तापु पोळी ! शोकु कैसेनि जाळी ?

अर्थ—हे (गुरुकृपादृष्टी), जर तूं अनुग्रहरूपी[1] पाण्याच्या[1] लाटांनीं[1] (युक्त अशा) पुरानें येशील (शब्दशः–येतेस), तर कोणाला ताप पोळील (शब्दशः–पोळतो) ? (आणि) शोक कसा जाळील (शब्दशः–जाळतो) ? (म्ह० तुझा अनुग्रह ज्याच्यावर होईल त्याला त्रिविध ताप व शोक बाधूं शकणार नाहींत).

योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळे ।
सोहंसिद्धीचे लळे । पाळिसी तूं ॥४॥

अन्वय—(हे) स्नेहाळे, तुझेनि सेवकां योगसुखाचे[1] सोहळे, तूं सोहं-सिद्धीचे[2] लळे पाळिसी.

अर्थ—(हे) प्रेमळे, तुझ्यामुळें भक्तांना अष्टांगयोगाच्या[1] सुखाचे[1] उपभोग (प्राप्त होतात); तूं–'तें ब्रह्म[2] मी आहे–' ह्या[2] अनुभवाचे[2] (भक्तांचे) लाड पुरवितेस. (म्ह० तुझ्यामुळें भक्तांना समाधिसुख व ब्रह्मानुभव प्राप्त होतो).

आधारशक्तीचिया अंकीं । वाढविसी कौतुकीं ।
हृदयाकाशपल्लकीं । परियें देसी निजे ॥५॥

अन्वय—आधारशक्तीचिया[1] अंकीं (तूं) कौतुकीं वाढविसी, हृदया-काशपल्लकीं[2] निजे परियें देसी.

अर्थ—मूलाधारचक्रावर[1] अधिष्ठित[1] असलेल्या[1] कुंडलिनीच्या[1] मांडी-वर (तूं) प्रेमानें (साधकास) वाढवितेस (व) हृदयाकाशरूपी[2] पाळ-ण्यांत[2] (घालून) झोंपेसाठीं झोके देतेस.

प्रत्यक्ज्योतीची वोवाळणी । करिसी मनपवनांचीं खेळणीं ।
आत्मसुखाचीं बाळलेणीं । लेवविसी ॥६॥

अन्वय—(तूं) प्रत्यक्ज्योतीची वोवाळणी करिसी, मनपवनांचीं[1] खेळणीं (करिसी) (व) आत्मसुखाचीं बाळलेणीं[2] लेवविसी.

अर्थ—(तूं साधकरूपी बालकास) आत्मज्योतीची ओवाळणी करितेस (म्ह० आत्मज्योतीच्या निरांजनानें ओवाळतेस); मनाचीं[1] व[1] प्राणाचीं[1]

खेळणीं (देतेस) (व) स्वरूपानंदरूपी ल्हान[२] मुलाचे[२] दागिने[२] (अंगावर) चढवितेस (घालितेस).

सतरावियेचें स्तन्य देसी । अनुहताचा हल्लरु गासी ।
समाधिबोधें निजविसी । बुझाऊनि ॥७॥

अन्वय--(तूं) सतरावियेचें स्तन्य देसी, अनुहताचा हल्लरु गासी, समाधिबोधें[१] बुझाऊनि[२] निजविसी.

अर्थ--(तूं साधकांना) जीवनकलेचें (अंगावरलें) दूध (म्ह० स्तनपान) देतेस, अनाहतध्वनीचें अंगाईगीत गातेस (व) समाधीच्या[१] बोधानें[१] समजूत[२] घालून[२] (म्ह० तो अनुभवास आणून देऊन) (त्यांना) (आत्मस्वरूपीं) झोंपवितेस.

म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाउलीं ।
या कारणें मी साउली । न संडीं तुझी ॥८॥

अन्वय--म्हणोनि साधकां तूं माउली, सारस्वत[१] तुझिया पाऊलीं[२] पिके[२], या[३] कारणें[३] तुझी साउली मी न संडीं.

अर्थ--म्हणून साधकांची तूं आई (आहेस), सर्व[१] विद्या[१] तुझ्या चरणमुद्रेच्या[२] ठिकाणीं[२] उत्पन्न[३] होतात;[३] एवढ्याकरितां[३] तुझें सान्निध्य मी सोडीत नाहीं.

अहो सद्‌गुरूचिये कृपादृष्टी । तुझें कारुण्य जयातें अधिष्ठी ।
तो सकळ-विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ॥९॥

अन्वय--अहो सद्‌गुरूचिये कृपादृष्टी, तुझें कारुण्य जयातें अधिष्ठी, तो सकळ विद्यांचिये सृष्टी धात्रा होय.

अर्थ--हे सद्‌गुरूचे कृपादृष्टे, तुझी कृपा ज्याच्यावर वसते, तो सर्व विद्यारूपी सृष्टीचा (उत्पादक) ब्रह्मदेव होतो [म्ह० तो सर्व विद्यांच्या निर्मितीच्या (बाबतींत) प्रतिब्रह्मदेवच बनतो.]

म्हणोनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते ।
आज्ञापीं मातें । ग्रंथनिरूपणीं ॥१०॥

अन्वय--म्हणोनि निजजनकल्पलते[१], श्रीमंते, अंबे, ग्रंथनिरूपणीं[२] मातें आज्ञापीं[३],

अर्थ—म्हणून आपल्या[१] भक्तांची[१] (इच्छा पुरविणारी) कल्पलता[१] वैभवसंपन्न (अशा) माते, ग्रंथाचें[२] व्याख्यान[२] करण्याच्या[२] बाबतींत[२] मला अनुज्ञा[३] दे[३].

नवरसीं भरवीं सागर । करवीं उचित रत्नांचे आगर ।
भावार्थाचे गिरवर । निफजवीं माये ॥ ११ ॥

अन्वय—(हे) माये, नवरसीं सागर भरवीं[१], उचित रत्नांचे आगर करवीं[२], भावार्थाचे गिरवर[३] निफजवी[३].

अर्थ—(हे) आई, (मला या ग्रंथानिरूपणांत) नवरसांचे सागर भरविण्यास[१] समर्थ[१] कर[१]; योग्य शब्दरत्नांच्या खाणी (मजकडून) तयार[२] करीव[२] (व) तात्पर्यार्थांचे मोठाले[३] पर्वत[३] निर्माण[३] करीव[३].

साहित्यसोनियाचिया खाणी । उघडवीं देशियेचिया क्षोणी ।
विवेकवेलीची लावणी । हों देईं सैंघ ॥ १२ ॥

अन्वय—देशियेचिया क्षोणीं साहित्यसोनियाचिया[१] खाणी उघडवीं[२], विवेकवेलीची लावणी सैंघ हों देईं.

अर्थ—मराठीभाषारूपी भूमीमध्यें अलंकारशास्त्ररूपी[१] सोन्याच्या[१] खाणी खोदण्यास[२] (मला) समर्थ[२] कर[२] (आणि) विचाररूपी[३] लतेची[३] लागवड पुष्कळ होऊं दे.

संवादफळनिधानें । प्रमेयाचीं उद्यानें ।
लावीं म्हणे गहनें । निरंतर ॥ १३ ॥

अन्वय—संवादफळनिधानें प्रमेयाचीं गहनें उद्यानें निरंतर लावीं, म्हणें.

अर्थ—प्रश्नोत्तरचर्चारूपी[१] फळांनीं[१] भरलेलीं[१] सिद्धांतांचीं (म्ह० सिद्धान्तरूपी झाडांचीं) दाट उपवनें एकसारखीं लाव, (असें मी) म्हणतों (म्ह० विनंती करतों).

पाखांडाचे दरकुटे । मोडीं वाग्वाद-अव्हांटे ।
कुतर्कांचीं दुष्टें । सावजें फेडीं ॥ १४ ॥

अन्वय—पाखांडाचे दरकुटे, वाग्वादअव्हांटे[१] मोडीं[२]; कुतर्कांचीं दुष्टें सावजें फेडीं[३].

अर्थ—नास्तिकमतरूपी दऱ्या (आणि) वितंडवादरूपी[१] आडवाटा[१]

(अर्थात् आडमार्गांतील लपावयाच्या जागा) मोडून[२] टाक[२] (म्ह० नष्ट कर), (व अशा रीतीनें) तर्कटरूपी हिंस्र श्वापदें हुसकून[३] लाव[३].

श्रीकृष्णगुणीं मातें । सर्वत्र करीं वो सरतें ।
राणिवे वैसवीं श्रोतें । श्रवणाचिये ॥१५॥

अन्वय–वो (गुरुकृपादृष्टी) श्रीकृष्णगुणीं[१] मातें सर्वत्र[२] सरतें करीं श्रोते श्रवणाचिये राणिवे वैसवीं.

अर्थ–हे (गुरुकृपादृष्टे) श्रीकृष्णगुणांच्या[१] वर्णनांत[१] मला सर्व[२] प्रकारें[२] (अर्थात् पूर्णपणें) समर्थ कर; (आणि) श्रोत्यांना श्रवणाच्या (श्रवण सुखाच्या) राज्यावर बसव.

ये म-हाठियेचिया नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं ।
घेणें देणें सुखचिवरी । हों देईं या जगा ॥१६॥

अन्वय–ये म-हाठियेचिया[१] नगरीं ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं, या जगा सुखचिवरी[२] घेणें[३] देणें[३] हों देईं.

अर्थ–या मराठी[१] भाषेच्या[१] नगरांत आत्मज्ञानाची समृद्धि कर, या जगांत केवळ[२] सुखानेंच[२] (अर्थात् सुखाचीच) देवघेव[३] होऊं दे.

तूं आपुलेनि स्नेहपल्लवें । मातें पांघुरविशील सदैवे ।
तरि आतांचि हें आघवें । निर्मीन माये ॥ १७ ॥

अन्वय–(हे) सदैवे माये, तूं आपुलेनि स्नेहपल्लवें[१] मातें पांघुरविशील[२], तरि हें आघवें आतांचि निर्मीन[३].

अर्थ– (हे) भाग्यशाली माते (गुरुकृपादृष्टे), तूं आपल्या प्रेमरूपी[१] पदराचें[१] (शब्दशः–पदरानें) (जर) मला पांघरूण[२] घालशील[२], तर हें सर्व (म्ह० ह्या वरील सर्व गोष्टी) आतांच (मी) उत्पन्न[३] करीन[३].

इये विनवणीयेसाठीं । अवलोकिलें गुरुकृपादृष्टीं ।
म्हणे गीतार्थेसीं उठीं । न बोलें बहु ॥ १८ ॥

अन्वय–इये विनवणीयेसाठीं गुरुकृपादृष्टी अवलोकिलें (आणि) म्हणे, गीतार्थेसीं उठीं[१] बहु न बोलें.

अर्थ–या विनंतीबरोबर गुरुकृपादृष्टीनें (ज्ञानेश्वरांच्याकडे) पाहिलें (आणि) म्हटलें, ' गीतार्थासह ऊठ (म्ह० गीतार्थ सांगण्यास प्रवृत्त[१] हो[१]);

(आतां) फार बोलूं नकोस.' (म्ह० पाल्हाळ करूं नकोस).

तेथ जी जी महाप्रसादु । म्हणोनि साविया जाहला आनंदु ।
आतां निरोपीन प्रबंधु । अवधान दीजे ॥१९॥

अन्वय--तेथ जी जी महाप्रसादु[१], म्हणोनि[३] साविया आनंदु जाहला, आतां प्रबंधु निरोपीन[२] अवधान दीजे.

अर्थ--(असें गुरु म्हणाले) तेव्हां " होय, होय, (जशी आपली आज्ञा); (ही आपली मजवर) मोठी[१] कृपा[१] (झाली) " (असें ज्ञानेश्वरमहाराज म्हणाले); अशा[३] प्रकारें[३] (ज्ञानदेवांना) सहजच (मोठा) आनंद झाला (व ते म्हणाले) " आतां (मी) ग्रंथाचें व्याख्यान[२] करीन[२] (आपण) लक्ष द्यावें. "

अर्जुन उवाच—

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

तरी सकळवीराधिराजु । जो सोमवंशीं विजयध्वजु ।
तो बोलता जाहला आत्मजु । पांडुनृपाचा ॥२०॥

अन्वय--तरी जो सकळवीराधिराजु[१], सोमवंशीं विजयध्वजु[२], पांडुनृपाचा आत्मजु तो बोलता[३] जाहला[३].

अर्थ--नंतर जो सर्व[१] वीरांचा[१] मुख्यनायक[१], चंद्रवंशांतील जयाची[२] पताका[२] (व) पांडुराजाचा मुलगा तो (अर्जुन) म्हणाला[३] (शब्दशः--बोलणारा झाला).

कृष्णातें म्हणे अवधारिलें । आपण विश्वरूप मज दाविलें ।
तंव नवल म्हणोनि बिहालें । चित्त माझें ॥२१॥

अन्वय--कृष्णातें म्हणे अवधारिलें, आपण विश्वरूप मज दाविलें, तंव (तें) नवल म्हणोनि माझें चित्त बिहालें[१].

अर्थ--(तो) कृष्णाला म्हणाला, ऐकलें (कां) ? आपण (जेव्हां) विश्वरूप मला दाखविलें, तेव्हां (तें) अद्भुत म्हणून माझें मन भयभीत[१] झालें[१].

आणि इये कृष्णमूर्तीची सवें । यालागीं सोय धरिली जीवें ।
तंव नको म्हणोनि देवें । वारिलें मातें ॥ २२ ॥

अन्वय--आणि (मज) इये कृष्णमूर्तीची सवे (आहे) यालागीं (हिची) सोय जीवें धरिली, तंव देवें ' नको ' म्हणोनि मातें वारिलें.[1]

अर्थ--आणखी (मला) ह्या कृष्णमूर्तीची संवय (आहे) म्हणून (हिचा) आश्रय मनानें इच्छिला, तेव्हां देवांनीं ' नको ' (असें) म्हणून मला परावृत्त[1] केलें[1].

तरि व्यक्त आणि अव्यक्त । हें तूंचि एक निभ्रांत ।
भक्ती पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें ॥ २३ ॥

अन्वय--तरि व्यक्त आणि अव्यक्त हें तूंचि एक निभ्रांत (अससी), व्यक्त भक्ती पाविजे[1] (आणि) अव्यक्त योगें (पाविजे[2]).

अर्थ--आतां साकार (सगुण) व निराकार (निर्गुण) ह्या (दोन्हीं रूपांनीं) तूंच एक निःसंशय (आहेस), सगुण भक्तीनें प्राप्त[1] केलें[1] जातें[1] (व) निर्गुण योगानें (प्राप्त[2] केलें[2] जातें[2]).

या दोनी जी वाटा । तूतें पावावया वैकुंठा ।
व्यक्ताव्यक्त दारवंठा । रिगिजे येथ ॥ २४ ॥

अन्वय--जी वैकुंठा, तूतें पावावया या दोनी वाटा (असती) येथ[1] व्यक्ताव्यक्त[2] दारवंठां रिगिजे[3].

अर्थ--महाराज श्रीकृष्णा, तुला पोहचण्यासाठीं हे दोन मार्ग (आहेत); या[1] ठिकाणीं[1] (म्ह० या दोन वाटांच्या शेवटीं) साकार[2] (म्ह० सगुण) (आणि[2]) निराकार[2] (म्ह० निर्गुण) (ह्यांच्या) उंबरठ्यांत शिरतां[3] येतें[3] (शब्दशः --शिरकाव[3] केला[3] जातो.[3]) [म्ह० भक्ति व योग ह्या दोन मार्गांच्या अंतीं अनुक्रमें सगुणाची व निर्गुणाची प्राप्ति होते.] [अथवा वैकल्पिक अर्थ--येथें[1] (म्ह० वैकुंठांत अर्थात् तुझ्या ठिकाणीं) साकार--निराकार दरवाज्यांनीं (म्ह० सगुणनिर्गुणोपासनांच्या द्वारांपैकीं, कोणत्याहि एकानें) शिरतां येतें.].

पैं जे वानी स्यातुका । तेंचि वेगळिया वाला येका ।
म्हणोनि एकदेशिया व्यापका । सरिसा पाडू ॥ २५ ॥

अन्वय--जे वानी स्यातुका[1] (असे) तेंचि (वानी) वेगळिया येका वाला (असे) म्हणोनि एकदेशिया (आणि) व्यापका पाडू

सरिसा (असे).

अर्थ--जो कस शंभर[१] भाराला[१] (म्ह० शंभर भार सोन्याच्या लगडीचां असतो) तोंच (कस) वेगळ्या एका वालाला (म्ह० वालभर सोन्याला असतो); म्हणून अंशव्यापी (आणि) सर्वव्यापी (अशा दोन्ही रूपांची] योग्यता सारखीच (ठरते).

अमृताचिया सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी ।
तेचि दे अमृतलहरी । चुळीं घेतालिया ॥ २६ ॥

अन्वय--अमृताचिया सागरीं जे सामर्थ्याची थोरी लाभे[१], तेचि अमृतलहरी चुळीं घेतलिया दे[३].

अर्थ--अमृताच्या समुद्रामध्यें जो प्रभावाचा उत्कर्ष प्राप्त[१] होतो[१] तोच (उत्कर्ष) अमृताची लाट[२] चुळींत (गुळण्यांत) घेतली[३] असतां[३] देते.

हे कीर माझ्या चित्तीं । प्रतीति आथि जी निरुती ।
परि पुसणें योगपती । तें याचिलागीं ॥ २७ ॥

अन्वय--जी योगपती, माझ्या चित्तीं हे कीर प्रतीति निरुती आथि, परि पुसणें तें याचिलागीं.

अर्थ--महाराज योगेश्वरा (श्रीकृष्णा), माझ्या मनामध्यें हीच खरोखर प्रतीति (म्ह० अनुभव) निश्चयेंकरून आहे; परंतु (माझें) विचारणें तें अशाच साठीं (कीं)--

जें देवा तुम्हीं नावेक । अंगिकारिलें व्यापक ।
तें साचाचि कीं कवतिक । हें जाणावया ॥ २८ ॥

अन्वय--देवा, जें व्यापक (रूप) तुम्हीं नावेक अंगिकारिलें[१], तें साचचि कीं कवतिक (होतें) हें जाणावया.

अर्थ--श्रीकृष्णा, जें विश्वव्यापक (विश्वरूप) तुम्हीं क्षणभर (अर्थात् कांहीं काळ) धारण[१] केलें[१] (होतें), तें (व्यापकरूप) खरेंच कीं (नुसता) चमत्कार (म्हणून घेतलें होतें) हें जाणण्यासाठीं (म्हणून मी आपणांस प्रश्न विचारीत आहें).

तरि तुजलागीं कर्म । तूंचि जयांचें परम ।
भक्तीसी मनोधर्म । विकोनि घातला ॥ २९ ॥

अन्वय–तरि (जयांचें) कर्म तुजलागीं (घडे), तूंचि जयांचें परम (होसी), (जिहीं) मनोधर्म[1] भक्तीसी विकोनि घातला.

अर्थ–तरि (ज्यांचें) कर्म तुझ्याकरितां (होतें), तूंच ज्यांचें सर्वोत्कृष्ट (ध्येय किंवा प्राप्य आहेस), (आणि ज्यांनीं आपल्या) मनाचा[1] सर्व[1] व्यापार[1] भक्तीला विकून टाकला (म्ह० भक्तीच्या स्वाधीन केला).

इत्यादि सर्वांपरी । जे भक्त तूतें श्रीहरी ।
बांधोनियां जिव्हारीं । उपासिती ॥ ३० ॥

अन्वय– (हे) श्रीहरी, इत्यादि सर्वांपरी[1] जे भक्त तूतें जिव्हारीं बांधोनियां[2] उपासिती.

अर्थ– (हे) कृष्णा, इत्यादि सर्व[1] प्रकारांनीं[1] जे भक्त तुला अंतःकरणांत दृढ[2] धरून[2] भजतात.

आणि जें प्रणवापैलीकडे । वैखरीयेसि जें कानडें ।
कायिसयाहि सांगडें । नव्हे जें वस्तु ॥ ३१ ॥

अन्वय–आणि जें वस्तु प्रणवापैलीकडे[1] (असे), वैखरीयेसि[2] जें कानडें (असें), (आणि) जें कायिसयाहि सांगडें नव्हे.

अर्थ–आणि जें ब्रह्म ओंकाराच्या[1] पलीकडे[1] (आहे), (आणि) व्यावहारिक[2] वाणीला[2] जें दुर्बोध (म्ह० अगोचर) (आहे), (आणि) जी (ब्रह्मवस्तु) कशाहि सारखी (आहे) (म्हणून सांगतां येत) नाहीं.

तें अक्षर जें अव्यक्त । निर्देशदेशरहित ।
सोहंभावें उपासित । ज्ञानिये जें ॥ ३२ ॥

अन्वय–जी, तें अक्षर, अव्यक्त, निर्देश[1] देशरहित[2] (वस्तु), जे ज्ञानिये[3] सोहंभावें[4] उपासित.

अर्थ–हे (श्रीकृष्णा), ती अविनाशी, निराकार, जी[1] दाखवितां[1] येत[1] नाहीं[1] (आणि) जिचें[2] स्थान[2] सांगतां[2] येत[2] नाहीं[2] (अशी वस्तु), जे ज्ञानी[3] लोक[3] 'ती[4] (म्ह० ब्रह्मवस्तु) मीच[4] आहें[4], अशा[4] भावनेनें[4] उपासितात.

तयां आणि जी भक्तां । येरयेरांमाजीं अनंता ।
कवणें योगु तत्त्वता । जाणितला सांगा ॥ ३३ ॥

अन्वय–जी अनंता, तयां आणि भक्तां येरयेरांमाजीं[1] कवणें योगु तत्त्वता

जाणितला[२] सांगा.

अर्थ—महाराज श्रीकृष्णा, (असे) ज्ञानी (शब्दशः – त्यांच्यांत) आणि भक्त (शब्दशः – भक्तांत) या[१] परस्परांत[१] (अर्थात् या दोहोंमध्यें) कोणाकडून योग खरोखर जाणिला[२] गेला[२] (तें) सांगा.

इयां किरीटीचिया बोला । तो जगद्वंधु संतोषला ।
म्हणे हो प्रस्नु भला । जाणसी करूं ॥ ३४ ॥

अन्वय—इया किरीटीचिया बोला तो जगद्वंधु संतोषला[१] म्हणे, हो प्रस्नु करूं[२] भला जाणसी.

अर्थ—या अर्जुनाच्या बोलण्यानें तो श्रीकृष्ण संतुष्ट[१] झाला[१] [आणि] म्हणाला, " अरे (अर्जुना) प्रश्न[२] कसा[२] करावा[२] (हें तूं) चांगलें जाणतोस "

श्रीभगवान् उवाच—

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥

तरी अस्तुगिरीचिया उपकंठीं । रिगालिया रविबिंबापाठीं ।
रश्मी जैसे किरीटी । संचरती ॥ ३५ ॥

अन्वय—किरीटी, तरि अस्तुगिरीचिया उपकंठीं रिगालिया रविबिंबापाठीं[१] जैसे रश्मी संचरती.

अर्थ—अर्जुना, तरि अस्ताचलाच्या जवळ शिरलेल्या (म्ह० प्राप्त झालेल्या) सूर्यबिंबाच्या[१] मागोमाग[१] ज्याप्रमाणें किरणें जातात—

कां वर्षाकाळीं सरिता । जैसी चढों लागे पांडुसुता ।
तैसी नीच नवी भजतां । श्रद्धा दिसे ॥ ३६ ॥

अन्वय—पांडुसुता, कां जैसी वर्षाकाळीं सरिता चढों लागे, तैसी भजतां[१] श्रद्धा नीच नवी दिसे.

अर्थ—अर्जुना, अथवा ज्याप्रमाणें पावसाळ्यांत नदी वाढूं लागते, त्याप्रमाणें (माझें) भजन[१] करतांना[१] (भक्तांची) श्रद्धा प्रतिदिनीं नवीनवी दिसते.

परि ठाकिलियाहि सींगरु । जैसा मागीलही यावा अनिवारु ।
तियें गंगेचियें ऐसीं पडिभरु । प्रेमभावा ॥ ३७ ॥

अन्वय–परि सागरु ठाकिलियाहि मागीलहि[१] यावा, जैसा अनिवारु (असे) तिये गंगेचिये ऐसा प्रेमभावा पडिभरु[२] (असे).

अर्थ–परंतु समुद्राला पोहंचल्यावरसुद्धां (गंगेचा) मागून[१] येणारा[१] (पाण्याचा) लोंढा, जसा अलोट (असतो) (तसा) त्या गंगेच्या (लोंढ्या–) प्रमाणें (ज्यांच्या) प्रेमभावाला अधिक[२] भर[२] (असतो).

तैसें सर्वेंद्रियांसहित । मजमाजीं सूनि चित्त ।
जे रात्र दिवस न म्हणत । उपासिती ॥ ३८ ॥

अन्वय—तैसें सर्वेंद्रियांसहित[१] मजमाजीं[२] चित्त सूनि जे रात्र दिवस न म्हणत उपासिती[३].

अर्थ––त्याप्रमाणें सर्व[१] इंद्रियांसह[१] माझ्या[२] ठिकाणीं[२] मन लावून जे (भक्त) रात्र (आहे कां) दिवस (आहे) न म्हणतां (म्ह० ह्याचा विचार न करतां) (माझी) उपासना[२] करतात[२].

इयापरी जे भक्त । आपणपें मज देत ।
तेचि मी योगयुक्त । परम मानीं ॥ ३९ ॥

अन्वय—इयापरी[१] जे भक्त मज आपणपें देत, तेचि परम योगयुक्त मी मानीं.

अर्थ––अशा[१] प्रकारें[१] जे भक्त मला आत्मार्पण करतात, तेच श्रेष्ठ योगी (असें) मी समजतों.

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥
सन्नियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥

आणि येर तेही पांडवा । जे आरूढोनि सोहंभावा ।
झोंबती निरवयवा । अक्षरासी ॥ ४० ॥

अन्वय–पांडवा, आणि येर तेहि जे सोहंभावा[१] आरूढोनि[२] निरवयवा अक्षरासी झोंबती.

अर्थ–अर्जुना, आणि दुसरे तेसुद्धां जे (योगी) 'तें ब्रह्म मी आहे' अशा[१] भावनेचा[१] स्वीकार[२] करून[२] अवयवरहित अक्षराला (म्ह० अविनाशी

अशा ब्रह्माला) बिलगतात.

मनाची नखी न लगे । जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे ।
इंद्रियां कीर जोगें । कायि होईल ॥४१॥

अन्वय–जेथ[१] मनाची नखी न लगे, बुद्धीची दृष्टि न रिगे (तें) कीर इंद्रियां जोगें होईल कायि ?

अर्थ–ज्या[१] ठिकाणीं[१] मनाचें नख रुपत नाहीं, बुद्धीची जाणीव शिरत नाहीं; (मग ती वस्तु) खरोखर इंद्रियांना गोचर होईल काय ?

परि ध्यानाहीं कुवाडें । म्हणोनि एकें ठायीं न संपडे ।
व्यक्तीसि माजिवडें । कवणेंही नोहे ॥४२॥

अन्वय–परि (तें) ध्यानाही कुवाडें (असें), म्हणोनि एके ठायीं न संपडे, कवणेंही व्यक्तीसि माजिवडें नोहे[१].

अर्थ–परंतु (तें) ध्यानालाहि अगम्य असतें; कारण (तें) एका ठिकाणीं सांपडत नाहीं; (आणि) कोणत्याहि आविष्कारांत अंतर्गत होत[१] नाहीं[१] (म्ह० कोणत्याहि प्रकारें चर्मचक्षूस गम्य होत नाहीं.)

जया सर्वत्र सर्वपणें । सर्वांही काळीं असणें ।
जें पावूनि चिंतवणें । हिंपुटी जाहलें ॥४३॥

अन्वय–जया सर्वत्र,[१] सर्वांही काळीं सर्वपणें असणें, जें पावूनि[२] चिंतवणें हिंपुटी जाहलें.

अर्थ–ज्याचें (म्ह० ज्या वस्तूचें) सर्व[१] ठिकाणीं[१], सर्वहिकाळीं सर्वरूपानें अस्तित्व (असतें); ज्याचा विचार[२] करूं[२] जातां[२] चिंतनसामर्थ्य (आपल्या असामर्थ्याबद्दल) लज्जित झालें.

जें होय ना नोहे । जें नाहीं ना आहे ।
ऐसें म्हणोनि उपाये । उपजतीचिना ॥४४॥

अन्वय–जें होय[१] ना, नोहे[२] (ना), जें नाहीं ना[३], आहे (ना)[४], ऐसें म्हणोनि उपाये उपजतीचिना[५].

अर्थ–जें उत्पन्न[१] होत[१] नाहीं (किंवा) नाशही[२] पावत[२] (नाहीं), जें नाहीं असेंही[३] नाहीं[३] (व) आहे (असेंहि[४] नाहीं[४]), असें (आहे) म्हणून (त्याला पोहचविणारीं) साधनें संभवतच[५] नाहींत[५].

जें चळे ना ढळे । सरे ना मैळे ।
तें आपुलेनीचि बळें । आंगविलें जिहीं ॥४५॥

अन्वय–जें ढळे (ना) चळे ना; सरे ना मैळे (ना), तें जिहीं आपुलेनीचि बळें आंगविलें.[1]

अर्थ–जें सरतही (नाहीं) (व) हलतही नाहीं, संपतही नाहीं (व) मळतही (नाहीं), तें ज्यांनीं आपुल्याच सामर्थ्यानें आत्मसात्[1] (म्ह० स्वाधीन) करून[1] घेतलें[1].

पैं वैराग्यमहापावकें । जाळूनि विषयांचीं कटकें ।
अधपलीं तवकें । इंद्रियें धरिलीं ॥४६॥

अन्वय– (जिहीं) वैराग्यमहापावकें[1] विषयांचीं कटकें जाळूनि अधपलीं इंद्रियें तवकें धरिलीं.

अर्थ– (ज्यांनीं) वैराग्यरूप[1] मोठ्या[1] अग्नीनें[1] विषयांचीं सैन्यें जाळून (टाकून) होरपळलेलीं इंद्रियें धैर्यानें पकडलीं.

मग संयमाची धाटी । सूनि मुरडिलीं उफराटीं ।
इंद्रियें कोंडिलीं कपाटीं । हृदयाचियां ॥४७॥

अन्वय–मग इंद्रियें संयमाची धाटी सूनि उफराटीं मुरडिलीं, हृदयाचिया कपाटीं कोंडिलीं.

अर्थ–नंतर इंद्रियांना निग्रहाचा फास घालून (म्ह० इंद्रियांचा निग्रह करून) (तीं) उलट (म्ह० मागें) फिरविलीं (म्ह० अंतर्मुख केलीं); (आणि नंतर) हृदयाच्या गुहेंत कोंडलीं (म्ह० दाबून ठेविलीं).

अपानींचिया कवाडा । लावोनि आसनमुद्रा सुहाडा ।
मूळबंधाचा हुडा । पन्नासिला ॥४८॥

अन्वय– (हे) सुहाडा, अपानींचिया कवाडा आसनमुद्रा[1] लावोनि मूळबंधाचा हुडा पन्नासिला.[2]

अर्थ–(हे) वीरा (अर्जुना), अपानवायूच्या मार्गाला (म्ह० गुदद्वाराला) आसनरूपी[1] फळी[1] (किंवा खिटी) लावून मूळबंधाचा बुरुज सज्ज[2] केला[2].

आशेचे लाग तोडिले । अधैर्याचे कडे झाडिले ।
निद्रेचें शोधिलें । काळवखें ॥४९॥

अन्वय–आशेचे लाग तोडिले, अधैर्याचे कडे झाडिले[१] निद्रेचें काळवखें शोधिलें.[२]

अर्थ–आशेचे संबंध तोडले, अधैर्याचे कडे साफ[१] केले[१] (अर्थात् धैर्य दृढ केलें); झोपेचा अंधार (म्ह० निद्रेचा अम्मल) नष्ट[२] केला[२].

वज्राग्नीचिया ज्वाळीं । करूनि सप्तधातूची होळीं ।
व्याधींच्या सिसाळीं । पूजिलीं यंत्रें ॥५०॥

अन्वय––वज्राग्नीच्या ज्वाळीं सप्तधातूंची होळी करूनि व्याधींच्या सिसाळीं यंत्रें पूजिलीं.

अर्थ––वज्राग्नीच्या (म्ह० वज्रासनानें उत्पन्न केलेल्या उष्णतेच्या) ज्वाळांनीं सप्तधातूंचा होम करून रोगांच्या (म्ह० रोगरूपी पशूंच्या) मुंडक्यांनीं (शरीरस्थ मूलाधारादि षट्चक्ररूपी) तोफा पूजिल्या.

मग कुंडलिनियेचा टेंमा । आधारीं केला उभा ।
तया चोजवलें प्रभा । निमथावरी ॥५१॥

अन्वय–मग आधारीं कुंडलिनियेचा टेंमा उभा केला, तया प्रभा निमथावरी चोजविलें.

अर्थ–नंतर मूलाधारचक्रावर कुंडलिनीची मशाल उभी केली (व) तिच्या प्रकाशाला मस्तकापर्यंत (ब्रह्मरंध्रापर्यंत) पोहचविलें.

नवद्वारांचिया चौचकीं । बाणूनि संयतीची आडवंकी ।
उघडली खिडकी । ककारांतींची ॥ ५२ ॥

अन्वय–नवद्वारांचिया चौचकीं संयतीची आडवंकी बाणूनि ककारांतींची खिडकी उघडली[१].

अर्थ–नवद्वारांच्या (म्ह० नवद्वारयुक्त शरीराच्या) चौकांत (म्ह० मध्यभागांत, नाभिप्रांताच्या आसपास) संयमाचा अडसर घालून सुषुम्ना-नाडीचें मुख उघडण्यांत[१] आलें[१].

प्राणशक्तिचामुंडे । प्रहारूनि संकल्पमेंढे ।
मनोमहिषाचेनि मुंडें । दिधलीं वळी ॥५३॥

अन्वय–प्राणशक्तिचामुंडे[1] संकल्पमेंढे[2] प्रहारूनि, (तयांचीं मुंडें) मनोमहिषाचेनि[3] मुंडें वळी दिधलीं.

अर्थ–प्राणशक्तिरूप[1] चामुंडा[1] देवीला[1] संकल्परूपी[2] मेंढें[2] मारून (त्यांचीं मुंडकीं) मनोरूपी[3] रेड्याचें[3] मुंडक्यासह वळी दिलीं (म्ह० अर्पिलीं).

चंद्रसूर्यां बुझावणी । करूनि अनुहताची सुडावणी ।
सतरावियेचें पाणी । जिंतिलें वेगीं ॥५४॥

अन्वय–चंद्रसूर्यां बुझावणी, (आणि) अनुहताची सुडावणी करूनि, सतराविये चें पाणी वेगीं जिंतिलें.

अर्थ–(नंतर) चंद्रसूर्यांचें (म्ह० इडा व पिंगला यांतील वाहणाऱ्या वायूंचें, सुषुम्नेंत) ऐक्य (करून) अनाहताचा गजर करून जीवनकलेचें अमृत त्वरेनें जिंकलें (म्ह० प्राप्त करून घेतलें.)

मग मध्यमामध्यविवरें । तेणें कोरिवें दादरें ।
ठाकिलें चवरें । ब्रह्मरंध्रींचें ॥५५॥

अन्वय–मग मध्यमामध्यविवरें[1] तेणें कोरिवें दादरें ब्रह्मरंध्रींचें चवरें ठाकिलें.

अर्थ– मग सुषुम्नानाडीच्या[1] मध्यांतील[1] पोकळीनें[1] (म्हणजेच) त्या कोरीव जिन्यानें ब्रह्मरंध्राचें शिखर गांठलें.

वरी मकारांत सोपान । ते सांडोनियां गहन ।
काखे सूनियां गगन । भरले ब्रह्मीं ॥५६॥

अन्वय– वरी ते मकारांत गहन सोपान सांडोनियां, गगन काखे सूनियां ब्रह्मीं भरले[1].

अर्थ– नंतर ते (योगी) (ओंकारध्वनीची तिसरी मात्रा जो मकार त्या) मकारान्तरूपानें (असलेला म्ह० मकार ज्याच्या अंतीं आहे असा तीन मात्रारूप) कठीण जिना ओलांडून, मूर्ध्न्याकाशाला बगलेंत मारून, ब्रह्मामध्यें प्रवेश[1] करतात[1].

ऐसेन जे समबुद्धि । गिळावया सोहंसिद्धी ।
आंगवितात‍ि निरवधी । योगदुर्गें ॥५७॥

अन्वय–ऐसेन जे समबुद्धि, सोहंसिद्धि[1] गिळावया, निरवधी योगदुर्गें[2], आंगवितात‍ि[3].

अर्थ–अशाप्रकारें जे ब्रह्मैक्यबुद्धि धारण करणारे योगी ब्रह्मैक्यभावनेचा[1] प्रत्यय[1] घेण्याकरितां अमर्याद योगरूपी[2] किल्ले[2] स्वाधीन[3] करून[3] घेतात[3].

आपुलिया साटोवाटीं । शून्य घेती उठाउठी ।
तेही मातेंचि किरीटी । पावती गा ॥५८॥

अन्वय–गा किरीटी, (जे) उठाउठी आपुलिया साटोवाटीं शून्य घेती[2] तेही मातेंचि पावती.

अर्थ–अरे अर्जुना, (जे) त्वरेनें आपल्या मोबदल्यानें (म्ह० आपुलें जीवत्व देऊन) अव्यक्त घेतात, तेसुद्धां मलाच मिळतात.

वांचूनि योगाचेनि बळें । अधिक कांहीं मिळे ।
ऐसें नाहीं आगळे । कष्टचि तयां ॥५९॥

अन्वय—वांचूनि योगाचेनि बळें कांहीं अधिक मिळे ऐसें नाहीं, तयां आगळे कष्टचि[1] (होती).

अर्थ—एऱ्हवीं योगाच्या सामर्थ्यानें कांहीं जास्त मिळतें, असें नाहीं (तर) त्यांना अधिक कष्ट[1] मात्र[1] (पडतात).

क्लेशोऽधिकरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

जिहीं सकळभूतांचिया हितीं ! निरालंबीं अव्यक्तीं ।
पसरालिया आसक्ती । भक्तीवीण ॥६०॥

अन्वय–जिहीं सकळभूतांचिया[1] हितीं[2] निरालंबीं अव्यक्तीं[3] भक्तीवीण आसक्ती पसरालिया;

अर्थ–ज्यांनीं[1] सर्व प्राण्यांचें[1] (मूर्तिमंत) हित[2] असणाऱ्या[2], निराधार अव्यक्ताचें[3] (ब्रह्माचें) ठिकाणीं[3] भक्तीशिवाय आवडी धरली;

तयां महेंद्रादि पदें । करिताति वाटवधें ।
आणि ऋद्धिसिद्धींचीं द्वंद्वें । पडोनि ठाती ।।६१।।

अन्वय–तयां महेंद्रादि पदें वाटवधें करिताति, आणि ऋद्धिसिद्धींचीं[1] द्वंद्वें पडोनि ठाती.

अर्थ–त्यांना इंद्रादिकांचे अधिकार वाटमारेपणा करतात (म्ह० त्यांची वाट अडवितात व त्यांना भुरळ घालतात) आणि (पार्थिव) ऐश्वर्यें[1] (व) सिद्धि[1] (यांचीं[1]) द्वंद्वें (त्यांना अडविण्यासाठीं वाटेंत) पडून राहतात.

कामक्रोधांचे विलग । उठावती अनेग ।
आणि शून्येंसीं आंग । झुंझवावें कीं ।।६२।।

अन्वय–कामक्रोधांचे अनेग विलग उठावती[1], आणि शून्येंसीं आंग झुंझवावें[2] कीं.

अर्थ–कामक्रोधांचे पुष्कळ उपद्रव हल्ला[1] करतात[1] व निराकाराबरोबर शरीर लढवावें[2] लागतें[2] ना (म्ह० ब्रह्मप्राप्तीसाठीं शरीरानें लढण्याइतके कष्ट करावे लागतात ना).

ताहाने ताहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी ।
अहोरात्र वावीं । मवावा वारा ।।६३।।

अन्वय–ताहाने ताहानचि पियावी, भुकेलिया[1] भूकचि खावी, अहोरात्र वावीं वारा मवावा.

अर्थ–ताहानेला ताहानच प्यावी (लागते), भूक[1] लागली[1] असतां[1] भूकच खावी (लागते); रात्रंदिवस वावांनीं वारा मोजावा (लागतो) (म्ह० पांघरूण नसल्यामुळें वावांनी वाऱ्यालाच कवळत रहावें लागतें).

उन्निद्रेयाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें ।
झाडासी साजणें । चालावे गा ।।६४।।

अन्वय–-गा (अर्जुना), पहुडणें उन्निद्रेयाचें[1]; वेल्हावणें[2] निरोधाचें, साजणें झाडासी चालावे[3].

अर्थ– अरे (अर्जुना), (तेथील) निजणें (म्हणजे) जाग्या[1]

मनुष्याचें[१]; प्रेम[२] करणें[२] (म्हणजे) निग्रहाचेंच (व तेथील) मैत्री वृक्षाबरोबरच करावी[३] लागते[३].

शीत वेढावें । उष्ण पांघुरावें ।

वृष्टीचिया असावें । घराआंतु ॥६५॥

अन्वय–शीत वेढावें, उष्ण पांघुरावें[१], वृष्टीचिया घराआंतु असावें.

अर्थ–थंडीच नेसावी; उन्हाचेंच पांघरूण[१] घ्यावें[१] (आणि) पावसाच्याच घरांत रहावें (लागतें).

किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेशु नींच नवा ।

भातारेंवीण करावा । तो हा योगु ॥६६॥

अन्वय–पांडवा, किंबहुना[१] (जो) हा भातारेंवीण नीच नवा अग्निप्रवेशु करावा, तो हा योगु (असे).

अर्थ–अर्जुना, फार[१] काय[१] सांगावें[१], (जो) हा पतिवांचून प्रतिदिनीं नव्यानें अग्निप्रवेश करणें (म्ह० सती जाणें) तो हा योग (होय).

एथ स्वामीचें काज । ना बापिकें व्याज ।

परि मरणेंसी झुंझ । नित्य नवें ॥६७॥

अन्वय-- एथ[१] स्वामीचें कांज ना, बापिकें[२] व्याज ना, परि नित्य नवें मरणेंसीं झुंझ (असे).

अर्थ---या[१] ठिकाणीं[१] (म्ह० या योगामध्यें) धन्याची कामगिरी (बजावयाची) नसते; वंशपरंपरा[२] आलेल्या[२] (वैराच्या सूडाचें) निमित्त नसतें; तरीपण प्रतिदिवशीं नव्यानें मरणाबरोबर लढाई (खेळावी लागते).

ऐसें मृत्यूहूनि तिख । कां घोंटे कढत विख ।

डोंगर गिळितां मुख । न फाटे काई ॥६८॥

अन्वय--ऐसें मृत्यूहूनि तिख, कढत विख घोंटे, कां डोंगर गिळितां मुख फाटे न काई.

अर्थ---याप्रमाणें मृत्यूपेक्षां जहाल, रसरसीत विष गिळवतें (काय)? किंवा पर्वत गिळतांना तोंड फाटत (म्ह० फाटणार) नाहीं काय ?

म्हणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा ।

तयां दुःखाचाचि वाटा । भागा आला ॥६९॥

अन्वय—गा सुभटा, म्हणोनि जे योगाचिया वाटा निगाले, तयां भागा दुःखाचाचि वांटा आला.

अर्थ—अरे सुवीरा (अर्जुना), म्हणून जे योगाच्या मार्गाला लागले, त्यांच्या वाट्याला दुःखाचाच अंश (विभाग) आला.

पाहें पां लोहाचे चणे । जैं बोचरिया पडती खाणें ।

तैं पोट भरणें कीं प्राणें । शुद्धी म्हणों ॥७०॥

अन्वय—पाहें[1] पां, जैं लोहाचे चणे, बोचरिया[2] खाणें पडती, तैं (तें) पोट भरणें म्हणों, कीं प्राणें शुद्धी (म्हणों).

अर्थ—विचार[1] कर[1], बरें, जर लोखंडाचे फुटाणे, दंतहीन[2] माणसाला[2] खावे लागले, तर (त्या कृत्याला) पोट भरणें म्हणूं; का प्राणाशीं गांठ (म्हणूं) ? (म्ह० जीव गमावणें म्हणूं ?)

म्हणोनि समुद्र बाहीं । तरणें आथि केंही ।

कां गगनामाजीं पाईं । खोलिजतु असे ॥७१॥

अन्वय—म्हणोनि बाहीं समुद्र तरणें केंही आथि; कां पाईं गगनामाजीं खोलिजतु असे.

अर्थ—म्हणून बाहूंनीं समुद्र तरणें कोठें (शक्य) आहे? अथवा पायांनीं आकाशामध्यें चालतां येतें ?

वळघलिया रणाची थाटी । आंगीं न लगतां काठी ।

सूर्याची पाउटी । कां होय गा ॥७२॥

अन्वय—गा, रणाची थाटी वळघलिया[1] आंगीं काठी[2] न लगतां सूर्याची पाउटी होय कां.

अर्थ—अरे (अर्जुना), युद्धाच्या गर्दींत शिरलें[1] असतां[1] अंगावर कांठीचा[2] प्रहार[2] न बसतां सूर्याची (म्ह० सूर्यबिंब ही) पायरी होईल काय?

यालागीं पांगुळा हेवा । नव्हे वायूसि पांडवा ।
तेवीं देहवंता जीवां । अव्यक्तीं गति ॥७३॥

अन्वय–पांडवा, यालागीं (जेवीं) पांगुळा वायूसि हेवा नव्हे[1], तेवीं देहवंता जीवां अव्यक्तीं[2] गति (नोहे).

अर्थ–अर्जुना, म्हणून (ज्याप्रमाणें) पांगळ्याची वायूबरोबर स्पर्धा संभवत[1] नाहीं[1], त्याप्रमाणें शरीरधारी प्राण्यांना अव्यक्ताच्या[2] ठिकाणीं[2] प्रवेश (होत नाहीं).

ऐसाही जरी धिंवसा । बांधोनियां आकाशा ।
झोंबती तरी क्लेशा । पात्र होती ॥७४॥

अन्वय–ऐसाही[1] जरी धिंवसा बांधोनियां आकाशा झोंबती[2], तरी क्लेशा पात्र होती.

अर्थ–अशाहि[1] प्रकारचा[1] जर (कोणी) उत्साह धरून आकाशाला बिलगूं[2] पाहतील[2] (शब्दशः –बिलगतात), तर (ते केवळ) कष्टालाच योग्य होतील (शब्दशः –होतात).

म्हणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा ।
जे कां भक्तिपंथा । वोटंगले ॥७५॥

अन्वय–पार्था, म्हणोनि जे कां भक्तिपंथा वोटंगले[1], ते येर हे व्यथा नेणतीचि[2].

अर्थ–अर्जुना, म्हणून जे (कोणी) भक्तिमार्गाचा आश्रय[1] करतात[1]; ते दुसरे (भक्त) हें दुःख जाणतच[2] नाहींत[2] (म्ह० त्यांना दुःख भोगावें लागत नाहीं).

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥ ६ ॥

कर्मेंद्रियें सुखें । करिती कर्में अशेखें ।
जियें कां वर्णविशेखें । भागा आलीं ॥७६॥

अन्वय—जियें कां कर्में वर्णविशेखें भागा आलीं (तियें) अशेखें

(कर्में) कर्मेंद्रियें सुखें करिती.

अर्थ--जीं म्हणून कर्में (आपआपल्या) विशिष्टवर्णांनुसार (भक्तांच्या) वाट्याला येतात, (तीं) सगळीं (कर्में) (त्यांचीं) कर्मेंद्रियें आनंदानें करतात.

विधींतें पाळित । निषेधातें गाळित ।

मज देऊनि जाळित । कर्म फळें ॥७७॥

अन्वय–विधींतें पाळित[1], निषेधातें गाळित[2], मज कर्मफळें[3] देऊनि (कर्म) जाळित[4].

अर्थ–विधींचें पालन[1] करतात[1] (म्ह० शास्त्रांनीं सांगितलेली कर्में करतात), निषिद्धाचा (म्ह० शास्त्रानें मनाई केलेल्या कर्मांचा) त्याग[2] करतात[2] (आणि) मला कर्मांचीं[3] फळें[3] देऊन (कर्में) जाळून[4] टाकतात[4] (म्ह० भोग द्यावयास शिल्लक ठेवीत नाहींत).

ययापरी पाहीं । अर्जुना माझे ठाईं ।

संन्यासूनि नाहीं । करिती कर्में ॥७८॥

अन्वय--अर्जुना पाहीं[1], ययापरी माझे ठाईं (कर्मफळें) संन्यासूनि[2] कर्में नाहीं करिती.

अर्थ--अर्जुना, विचार[1] कर[1]; याप्रमाणें माझ्या ठिकाणीं (कर्मफळें) अर्पण[2] करून[2] (तीं) कर्में नष्ट करतात.

आणिकही जे जे सर्व । कायिक वाचिक मानसिक भाव ।

तयां मीवांचूनि धांव । आनौती नाहीं ॥७९॥

अन्वय--आणिकही जे जे सर्व कायिक वाचिक मानसिक भाव, तयां मीवांचूनि आनौती धांव नाहीं.

अर्थ--आणखीहि जे जे सर्व शरीराचे, वाणीचे (व) मनाचे व्यापार (आहेत), त्यांना मीखेरीज दुसरी गति (अर्थात् आश्रय) नाहीं.

ऐसे जे मत्पर । उपासिती निरंतर ।

ध्यानमिषें घर । माझें झाले ॥ ८० ॥

अन्वय–ऐसे[1] जे मत्पर[2], निरंतर (मज) उपासिती[3] (ते) ध्यान-मिषें[4] माझें घर झाले.

अर्थ–अशा[1] प्रकाराचे[1] जे मलाच[2] वाहिलेले[2] असतात[2], (व) अखंड (माझीच) उपासना[3] करतात[3] (ते) ध्यानाच्या[4] साधनानें[4] माझें (राहण्याचें) ठिकाण होतात (शब्दशः–झाले).

जयांचिया आवडी । केली मजशीं कुळवाडी ।
भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलीं कुळें ॥ ८१ ॥

अन्वय––जयांचिया आवडी, मजशीं कुळवाडी केली, भोग[1] मोक्ष बापुडीं कुळें त्याजिलीं[2].

अर्थ–ज्यांच्या प्रेमानें माझ्याशीं (कुळसंबंधाचा) व्यवहार केला (व) ऐहिक[1] सुखें[1] (आणि) मोक्ष (हीं) गरीब (शेत करणारीं) कुळें टाकून[2] दिलीं[2].

ऐसे अनन्ययोगें । विकले जीवें मनें आंगें ।
तयांचें कायि एक सांगें । जें सर्व मी करीं ॥ ८२ ॥

अन्वय––ऐसें अनन्ययोगें जीवें मनें आंगें (जे मज) विकले, तयांचें कायि एक सांगें, जें सर्व मी करीं.

अर्थ––याप्रमाणें अनन्यभक्तीनें जीवानें मनानें (व) शरीरानें (वे स्वतःस मला) विकतात (शब्दशः–विकले गेले), त्यांची काय एकच (गोष्ट मी करतों म्हणून) सांगूं; कारण (त्यांचें) सर्वच (म्ह० प्रत्येक कार्य) मी करतों.

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥

किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा ।
तो मातेचा सोयरा । केतुला पां ॥ ८३ ॥

अन्वय––धनुर्धरा, किंबहुना[1] जो मातेचिया उदरा ये, तो मातेचा केतुला पां सोयरा (असे).

अर्थ––अर्जुना, फार[1] काय[1] सांगावें[1], जो आईच्या पोटाला येतो

(म्ह० पोटीं जन्मतो), तो आईचा किती बरें आवडता (असतो) ?

तेवीं मी तयां । जैसे असती तैसियां ।
कळिकाळ नोकोनियां । घेतला पटा ॥ ८४ ॥

अन्वय--तेवीं (ते) जैसे असती, तैसियां तयां मी (असें), कळिकाळ नोकोनियां[1] (मी) पटा घेतला.

अर्थ--त्याप्रमाणें (ते) जसे (म्ह० ज्या स्थितींत) असतात, तशांना त्यांना मी (आईप्रमाणें असतों); (आणि) कळिकाळाचाहि (म्ह० मृत्युसारख्या संकटांचाहि) पराभव[1] करून[1] (म्ह० निवारण करून) (मीं त्यांचा) पतकरा (भार) घेतला (आहे).

एऱ्हवीं तरी माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता ।
काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ॥ ८५ ॥

अन्वय--एऱ्हवीं[1] तरी[1] माझिया भक्तां आणि (तयां) संसाराची चिंता, समर्थाची कांता कोरान्न[1] मागे काय ?

अर्थ--एऱ्हवींसुद्धां[1] माझे भक्त ! (शब्दशः--माझ्या भक्तांना) आणि (त्यांना) संसाराची काळजी ? (असें कधींच घडणार नाहीं); श्रीमंताची बायको कोरडी[1] भिक्षा[1] मागेल काय ?

तैसे ते माझे । कलत्र हें जाणिजे ।
कायिसेनिही न लाजें । तयांचेनि मी ॥ ८६ ॥

अन्वय--तैसे ते माझे कलत्र हें जाणिजे[1], तयांचेनि कायिसेनिही मी न[2] लाजें[2].

अर्थ--त्याप्रमाणें ते माझे कुटुंब (आहेत), असें समजावें (शब्दशः--समजलें[1] जातें[1]). त्यांच्या कशाहिमुळें (म्ह० कोणत्याहि करावयाच्या गोष्टीनें) मी लाजत नाहीं (म्ह० मला लाज[2] वाटत[2] नाहीं[2]).

जन्ममृत्यूचिया लाटीं । झळंबती इया सृष्टी ।
तें देखोनियां पोटीं । ऐसें जाहलें ॥ ८७ ॥

अन्वय--इया सृष्टी जन्ममृत्यूचिया लाटीं झळंबती[1], तें देखोनिया

पोटीं ऐसें जाहलें.

अर्थ--हीं भुवनें जन्ममृत्यूच्या लाटांत गटंगळ्या[१] खात[१] आहेत[१], हें पाहून (माझ्या) मनांत असें आलें (म्ह० असा विचार आला).

भवसिंधूचेनि माजें । कवणासि धाकु नुपजे ।
येथ जरी कीं माझें । बिहिती हन ॥ ८८ ॥

अन्वय--भवसिंधूचेनि माजें कवणासिं धाकु नुपजे[१], येथ[२] जरी कीं माझे बिहिती.

अर्थ--संसारसागराच्या पुरानें (खळबळाटानें) कोणाला भय उत्पन्न[१] होत[१] नाहीं[१], या[२] ठिकाणीं[२] जर कदाचित् माझे (भक्त) भितील (तर).

म्हणोनि गा पांडवा । मूर्तीचा मेळावा ।
करूनि त्यांचिया गांवा । धांवतु आलों ॥ ८९ ॥

अन्वय--गा पांडवा, म्हणोनि मूर्तीचा मेळावा करूनि त्यांचिया गांवा धांवतु आलों.

अर्थ--अरे अर्जुना, म्हणून शरीराचा संयोग करून (म्ह० मनुष्य देह धारण करून मी) त्यांच्या गांवाला (म्ह० मृत्युलोकाला) धांवत आलों.

नामाचिया सहस्रवरी । नावा इया अवधारीं ।
सजूनियां संसारीं । तारू जाहलों ॥ ९० ॥

अन्वय-- (अर्जुना) अवधारीं[१], इया सहस्रवरी[१] नामाचिया नावा सजूनियां[२] संसारीं तारू जाहलों.

अर्थ-- (अर्जुना) लक्षांत[१] ठेव[१]; ह्या एक[१] हजारपर्यंत[१] (अर्थात् हजारों नामांच्या होड्या सिद्ध[२] करून[२] (मी भक्तांना) संसारसागरांतून (तारण्यासाठीं) तारक झालों.

सडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले ।
परिग्रही घातले । तरियांवरी ॥ ९१ ॥

अन्वय--जे सडे देखिले, ते ध्यानकासे लाविले, परिग्रही तरियांवरी घातले.

अर्थ---जे (भक्त) एकटे (म्ह० अंतर्बाह्य परिग्रहरहित) पाहिले, ते ध्यानाच्या कांचाला (म्ह० ध्यानमार्गाला) लावले, (व) कुटुंबी (म्ह० परिग्रही) (नामरूपी) नौकांवर घातले.

प्रेमाची पेटी । बांधली एकांचां पोटीं ।
मग आणिले तटीं । सायुज्याचिया ॥ ९२ ॥

अन्वय---एकांचां[1] पोटीं प्रेमाची पेटी बांधली, मग सायुज्याचिया तटीं आणिले.

अर्थ---कांहीं[1] जणांच्या[1] पोटाला प्रेमाची सांगड बांधली, नंतर (त्यांना) मोक्षाच्या तीराला आणलें.

परि भक्तांचेनि नांवें । चतुष्पदादि आघवे ।
वैकुंठींचिये राणिवे । योग्य केले ॥ ९३ ॥

अन्वय---परि भक्तांचेनि नांवें चतुष्पदादि आघवे वैकुंठींचिये राणिवे योग्य केले.

अर्थ---परंतु भक्तांच्या नांवानें (म्ह० भक्त म्हणून) पश्वादि सर्व (प्राण्यांना) वैकुंठांतल्या (अर्थात् वैकुंठाच्या) राज्यावर (बसण्यास) पात्र केलें.

म्हणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता ।
तयातें समुद्धर्ता । आथी मी सदा ॥ ९४ ॥

अन्वय---गा, मी सदा तयातें समुद्धर्ता[1] (असें) म्हणोनि भक्तां एकही चिंता नाहीं.

अर्थ---अरे (अर्जुना), मी नेहमींच त्यांचा उद्धार[1] करणारा[1] (असतों) म्हणून (त्या माझ्या) भक्तांना एकही काळजी नसते.

आणि जेव्हांचि का भक्तीं । दिधली आपुली चित्तवृत्ती ।
तेव्हांचि मज सूती । त्यांचिये नाटीं ॥ ९५ ॥

अन्वय---आणि जेव्हांचि भक्तीं आपुली चित्तवृत्ती दिधली तेव्हांचि मज त्यांचिये नाटीं सूती.

अर्थ--आणि ज्यावेळेसच भक्त (शब्दशः--भक्तांनीं) आपुली चित्तवृत्ति (मला) देतात (शब्दशः--अर्पण केली), त्यावेळेसच (ते) मला त्यांच्या छंदांत घालतात.

याकारणें गा भक्तराया। हा मंत्र तुवां धनंजया।
कीजे जे यया। मार्गी भजिजे ॥ ९६ ॥

अन्वय--गा भक्तराया धनंजया, याकारणें हा मंत्र तुवां कीजे, जे यया मार्गी भजिजे[1].

अर्थ--अरे भक्तश्रेष्ठा अर्जुना, एवढ्याकरितां हें रहस्य तूं अनुसरावें; (तें हें) कीं, "ह्या मार्गाचा आश्रय[1] करावा[1]."

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥

अगा मानस हें एक। माझ्या स्वरूपीं वृत्तिक।
करूनि घालीं निष्टंक। बुद्धि निश्चयेंसी ॥ ९७ ॥

अन्वय--अगा, हें एक मानस माझ्या स्वरूपीं[1] निष्टंक वृत्तिक करूनि घालीं (आणि) बुद्धि निश्चयेंसी (माझ्या स्वरूपीं घालीं).

अर्थ--अरे (अर्जुना), हें (केवळ) एक मन माझ्या स्वरूपाच्या[1] ठिकाणीं[1] पूर्णपणें वतनदार करून ठेव (तशीच) बुद्धिही निश्चयानें (माझ्या ठिकाणीं लाव.)

इयें दोनी सरिसीं। मजमाजीं प्रेमेसीं।
रिगालीं तरी पावसी। मातें तूं गा ॥ ९८ ॥

अन्वय--गा (जरी) इयें दोनी सरिसीं मजमाजीं[1] प्रेमेसीं रिगालीं[2], तरी तूं मातें पावसी.

अर्थ--अरे (अर्जुना), (जर) हीं दोन्हीं जोडीनें माझ्या[1] ठिकाणीं[1] प्रेमानें प्रविष्ट[2] झालीं[2], तर तूं मला (निश्चयानें) पोहोचशील.

जे मन बुद्धि इहीं। घर केलें माझ्या ठायीं।
तरि सांगें मग काई। मी तूं ऐसें उरे ॥ ९९ ॥

अन्वय---जे मन बुद्धि इहीं माझ्या ठायीं घर केलें, तरि मग मी तूं ऐसें उरे काई, सांगें.

अर्थ---कारण मन (व) बुद्धि यांनीं माझ्या ठिकाणीं वास्तव्य केलें, तर मग ' मी तूं असें (म्ह० असा भेद) उरेल काय ? ' बोल.

म्हणोनि दीप पाल्वे । सवेंचि तेज माल्वे ।

कां रविबिंबासवें । प्रकाशु जाय ।। १०० ।।

अन्वय---म्हणोनि (जैं) दीप पालवे[१] (तैं) सवेंचि तेज मालवे[२], कां रविबिंबासवें प्रकाशु जाय.

अर्थ---म्हणून (जेव्हां) दिवा पदराच्या[१] वाऱ्यानें[१] जातो[१], (तेव्हां) (त्या) बरोबरच (त्याचा) प्रकाश नाहींसा[२] होतो[२], अथवा सूर्य-बिंबाबरोबर (जसा) प्रकाश जातो.

उचलल्या प्राणासरिसीं । इंद्रियेंही निगती जैसीं ।

तैसा मनोबुद्धिपाशीं । अहंकारु ये ।। १०१ ।।

अन्वय---उचलल्या[१] प्राणासरिसीं जैसीं इंद्रियेंही निगती, तैसा मनोबुद्धिपाशीं अहंकारु ये.

अर्थ---जावयास[१] निघालेल्या[१] प्राणाबरोबर ज्याप्रमाणें इंद्रियेंसुद्धां निघतात, त्याप्रमाणें मनबुद्धीबरोबर अहंकार येतो.

म्हणोनि माझिया स्वरूपीं । मनबुद्धि इयें निक्षेपीं ।

येतुलेनि सर्वव्यापी । मीचि होसी ।। १०२ ।।

अन्वय---म्हणोनि माझिया स्वरूपीं[१] इयें मनबुद्धि[२] निक्षेपीं, येतुलेनि सर्वव्यापी मीचि होसी.

अर्थ---म्हणून माझ्या स्वरूपाच्या[१] ठिकाणीं[१] हीं मन[२] (व) बुद्धि[२] ठेव, एवढ्यानें सर्वव्यापक (असा) मीच (तूं) होशील (शब्दशः--- होतोस).

यया बोला कांहीं । अनारिसें नाहीं ।

आपुली आण पाहीं । वाहतु असें गा ।। १०३ ।।

अन्वय--गा (अर्जुना) पाहीं[1], यया बोला कांहीं अनारिसें नाहीं, आपली आण वाहतु असें.

अर्थ--अरे (अर्जुना) विचार[1] कर[1], या बोलण्यांत कांहीं अन्यथा नाहीं; (या संबंधांत मी) स्वतःची शपथ वाहत आहें.

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥

अथवा हें चित्त । मनबुद्धीसहित ।
माझ्या हातीं अचुंबित । न शकसी देवों ॥१०४॥

अन्वय--अथवा मनबुद्धीसहित हें चित्त माझ्या हातीं अचुंबित देवों न शकसी.

अर्थ--किंवा मनबुद्धीसह हें चित्त माझ्या ताब्यांत सर्वस्वीं देण्यास समर्थ नसलास (तर)--

तरि गा ऐसें करीं । ययां आठां पाहारां माझारीं ।
मोटकें निमिषभरी । देतु जाय ॥१०५॥

अन्वय--गा (अर्जुना) तरि ऐसें करीं, ययां आठां पाहारांमाझारीं मोटकें निमिषभरी देतु जाय.

अर्थ--अरे (अर्जुना) तर असें कर; या आठ प्रहरांमध्यें (तें चित्त माझ्या ठिकाणीं) मोजकें क्षणभर देत जा.

मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख ।
तेतुलें अरोचक । विषयीं घेईल ॥१०६॥

अन्वय--मग जें जें निमिख माझें सुख देखेल, तेतुलें[1] विषयीं[2] अरोचक घेईल.

अर्थ--मग जो जो क्षण माझा आनंद पाहील, तितक्या[1] प्रमाणानें[1] (अर्थात् तेवढ्या प्रमाणांत) (चित्ताला) विषयांच्या[2] बाबतींत[2] वीट येईल.

जैसा शरत्कालु रिगे । आणि सरिता वोहटूं लागे ।
तैसें चित्त काढेल वेगें । प्रपंचौनी ॥१०७॥

अन्वय--जैसा शरत्कालु रिगे, आणि सरिता वोहट्टं लागे, तैसें चित्त प्रपंचौनी वेगें काढेल.

अर्थ---ज्याप्रमाणें शरदृतु प्रकटतो, आणि नदी (तात्काळ) ओसरूं लागते, त्याप्रमाणें (चित्त) संसारांतून वेगानें निघेल.

मग पुनवेहूनि जैसें । शशिबिंब दिसेंदिसें ।
हारपत अंवसे । नाहींचि होय ।।१०८।।

अन्वय---मग जैसें शशिबिंब पुनवेहूनि दिसेंदिसें हारपत[1] अंवसे नाहींचि होय.

अर्थ---अथवा ज्याप्रमाणें चंद्रबिंब पौर्णिमेपासून दिवसादिवसानें कमी-कमी[1] होत[1] अमावस्येला (पूर्णतः) नाहींसेंच होतें.

तैसें भोगाआंतूनि निगतां । चित्त मजमाजीं रिगतां ।
हळू हळू पांडुसुता । मीचि होईल ।।१०९।।

अन्वय--पांडुसुता, तैसें चित्त भोगाआंतूनि निगतां[1] मजमाजीं रिगतां[2] हळू हळू मीचि होईल.

अर्थ---अर्जुना, त्याप्रमाणें चित्त विषयभोगांतून निघत[1] निघत[1] माझ्या-मध्यें प्रवेश[2] करीत[2] करीत[2] (विषयभोगांतून पूर्णतः निघेल आणि) हळू हळू मद्रूप होईल.

अगा अभ्यासयोगु म्हणिजे । तो हा एकु जाणिजे ।
येणें कांहीं न निपजे । ऐसें नाहीं ।।११०।।

अन्वय--अगा, (जो) अभ्यासयोगु म्हणिजे[1], तो हा एकु जाणिजे, येणें कांहीं न निपजे, ऐसें नाहीं.

अर्थ--अरे (अर्जुना), (जो) अभ्यासमार्ग म्हटला[1] जातो[1]; तो हाच एक समजावा, यानें कांहीं साधत नाहीं, असें नाहीं.

पैं अभ्यासाचेनि बळें । एकां गति अंतराळे ।
व्याघ्र सर्प प्रांजळे । केले एकीं ।।१११।।

अन्वय---(पैं) अभ्यासाचेनि बळें एकां अंतराळे गति (झाली)

एकीं व्याघ्र[१] सर्प[१] प्रांजळे केले.

अर्थ–(पहा), अभ्यासाच्या सामर्थ्यानें एकांना (गोरखनाथांसारख्यांना) आकाशांत गमनसामर्थ्य (प्राप्त झालें); कित्येकांनीं (चांगदेवांसारख्यांनीं) वाघ[१]–सापहि[१] नम्र केले.

विष कीं आहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे ।
एकीं वाग्ब्रह्म थोकडें । अभ्यासें केलें ॥११२॥

अन्वय––विष कीं आहारीं पडे, समुद्रीं पायवाट जोडे[१], एकीं अभ्यासें वाग्ब्रह्म थोकडें केलें.

अर्थ––विष सुद्धां पचनीं पडतें; समुद्रावरही पायवाट प्राप्त[१] होतें[१]; कित्येकांनीं अभ्यासानें वेद अल्प (म्ह० हस्तगत अर्थात् कंठगत) केले.

म्हणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं ।
यालागीं माझ्या ठायीं । अभ्यासें मिळ ॥११३॥

अन्वय––म्हणोनि अभ्यासासि कांहीं[१] सर्वथा दुष्कर नाहीं, यालागीं माझ्या ठायीं अभ्यासें मिळ[२].

अर्थ––म्हणून अभ्यासाला कोणतीही[१] गोष्ट[१] मुळींच कठिण नाहीं; याकरितां माझ्या ठिकाणीं अभ्यासानें प्राप्त[२] हो[२].

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि ॥१०॥

कां अभ्यासाही लागीं । कसु नाहीं तुझिया आंगीं ।
तरी आहासी जया भंगीं । तैसाचि असें ॥११४॥

अन्वय––कां अभ्यासाही लागीं कसु तुझिया आंगीं नाहीं, तरी जया भंगीं आहासी, तैसाचि असें.

अर्थ––अथवा अभ्यासासाठीं सुद्धां (लागणारें) बळ (जर) तुझ्या अंगांत नसेल, तर ज्या रीतींत (अर्थात् स्थितींत) (तूं) आहेस, त्याच (रीतींत) रहा.

इंद्रियें न कोंडीं । भोगातें न तोडीं ।
अभिमानु न संडीं । स्वजातीचा ॥११५॥

अन्वय--इंद्रियें न कोंडीं, भोगातें न तोडीं, स्वजातीचा[१] अभिमानु न संडीं.

अर्थ–इंद्रियें कोंडूं (म्ह० इंद्रियांचें दमन करूं) नकोस, विषयभोगांना टाकूं नकोस (आणि) आपल्या[१] जातीचा[१] अभिमान टाकूं नकोस.

कुळधर्मु चाळीं । विधि निषेध पाळीं ।
मग सुखें तुज सरळी । दिधली आहे ॥११६॥

अन्वय---कुळधर्मु चाळीं, विधिनिषेध[१] पाळीं, मग तुज सुखें सरळी दिधली आहे.

अर्थ---कुळाचार चालव, (कर्माविषयीं) शास्त्राची[१] आज्ञा[१] (व) बंदी[१] पाळ; नंतर (असें तूं केल्यास) (मीं) तुला निःशंकपणें (वागण्यास) मोकळीक दिली आहे.

परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापारु होये ।
तो मी करितु आहें । ऐसें न म्हणें ॥११७॥

अन्वय–परि मनें वाचा देहें जो व्यापारु जैसा होये, तो (तैसा) 'मी करितु आहें' ऐसें न म्हणें.

अर्थ–परंतु मनानें वाणीनें (व) देहानें जें कर्म जसें घडतें, तें (तसें) "मी करीत आहें" असें म्हणूं नकोस.

करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे ।
विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ॥११८॥

अन्वय–करणें कां न करणें, हें आघवें, जेणें परमात्मेनि विश्व चळतसे तोचि जाणे.

अर्थ---(असुक) करावें किंवा (तमुक) न करावें, हें सर्व, ज्या परमात्म्याकडून (म्ह० ज्याच्या सत्तेनें) (हें सर्व) जग चालतें तोच जाणतो.

उणेयापुरेयाचें कांहीं । उरों नेदीं आपुलिया ठायीं ।
स्वजाती करूनि घेईं । जीवत्व आपुलें ॥११९॥

अन्वय–उणेयापुरेयाचें[१] कांहीं आपुलिया ठायीं उरों[२] नेदीं[२]; आपुलें जीवत्व स्वजाती[३] करूनि घेईं.

अर्थ–(कर्म) अपूर्णाचा[१] (म्ह० असांग होतें) (कां) संपूर्णाचा[१] (म्ह० सांग होतें) (याविषयींचा) कांहीं (खेद अथवा संतोष) आपल्या ठिकाणीं राहूं[२] देऊं[२] नकोस[२]. (तूं) आपुलें जीवित (म्ह० आयुष्यक्रम) आपल्या[३] जातीशीं[३] (योग्य) करून घे (म्ह० स्ववर्णाला योग्य अशीं कर्में कर).

माळियें जेउतें नेलें । तेउतें निवांताचि गेलें ।
तया पाणिया ऐसें केलें । होआवें गा ॥१२०॥

अन्वय––गा, जेउतें (पाणी) माळियें नेलें[१], तेउतें निवांतचि गेलें, तया पाणिया[२] ऐसें[२] केलें होआवें.

अर्थ––अरे (अर्जुना), जिकडे (पाणी) माळ्याकडून नेलें[१] जातें[१], तिकडे शांतपणानें (तें) जातें, त्या पाण्यासारखें[२] (अभिमानरहित आपलें) कर्म व्हावें.

एऱ्हवीं तरी सुभटा । उजू कां अव्हांटा ।
रथु काई खटपटा । करितु असे ॥१२१॥

अन्वय––सुभटा, एऱ्हवीं तरी रथु उजू कां अव्हांटा खटपटा करितु असे काई.

अर्थ––सुवीरा (अर्जुना), एरव्हीं तरी रथ (हा) सरळ (मार्ग आहे) किंवा आडमार्ग (आहे, हे पाहण्याची) खटपट (अर्थात् उद्योग) (कधीं) करीत असतो काय ? (तो रथ जिकडे सारथी नेईल तिकडे जातो).

म्हणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ती । इयें वोझीं नेघें मती ।
अखंड चित्तवृत्ती । आठवीं मातें ॥१२२॥

अन्वय––म्हणोनि प्रवृत्ति[१] आणि निवृत्ती[२] इयें वोझीं मती नेघें[३] (आणि) मातें चित्तवृत्ती अखंड आठवीं.

अर्थ––म्हणून (कर्म करण्यास) प्रवृत्त[१] होणें[१] आणि (कर्मा-

पासून) परावृत्त[२] होणें[२] हे (दोन्हीं) भार मनानें घेऊं[३] नकोस[३] (आणि) मला मनानें निरंतर स्मर.

आणि जें जें कर्म निपजे । तें थोडें बहु न म्हणिजे ।
निवांताचि अर्पिजे । माझ्या ठायीं ॥१२३॥

अन्वय--आणि जें जें कर्म निपजे तें थोडें बहु न[१] म्हणिजे[१] माझ्या ठायीं निवांतचि अर्पिजे[२].

अर्थ--आणि जें जें कर्म घडेल (शब्दशः --घडतें) तें (तें) थोडें (अथवा) फार म्हणण्यांत[१] येऊं[१] नये[१]; (तर तें तें कर्म) माझ्या ठिकाणीं निमूटपणें अर्पण[२] केलें[२] जावें[२].

ऐसिया मद्भावना । तनुत्यागीं अर्जुना ।
तूं सायुज्यसदना । माझिया येसी ॥१२४॥

अन्वय--अर्जुना ऐसिया मद्भावना तनुत्यागीं तूं माझिया सायुज्यसदना[१] येसी.

अर्थ--अर्जुना, अशा मद्विषयकनिष्ठेनें (कर्म केलेंस म्हणजे) देहान्तीं (म्ह० देहपातानंतर) तूं माझ्या सायुज्यमुक्तिरूप[१] घराला[१] (म्ह० सायुज्यमोक्षाला) येशील (शब्दशः--येतोस).

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

ना तरी हेंही तुज । नेदवे कर्म मज ।
तरी गा तूं भज । पांडुकुमरा ॥१२५॥

अन्वय--गा पांडुकुमरा, ना[१] तरी[१] हेंही कर्म तुज मज नेदवे[२], तरी तूं (ऐसें) भज[३].

अर्थ--अरे पांडुपुत्रा (म्ह० अर्जुना), किंवा[१] हेंसुद्धां कर्म तुला मला देववत[२] नसेल[२] (म्ह० अर्पण करवत नसेल) (शब्दशः --देववत नाहीं) तर तूं (पुढें सांगितल्याप्रमाणें) आचरण[३] कर[३].

बुद्धीचिये पाठीं पोटीं । कर्माआदि कां शेवटीं ।
मातें बांधणें किरीटी । दुवाड जरी ॥१२६॥

अन्वय–किरीटी, कर्मांआदि[१] बुद्धीचिये पोटीं कां (कर्मां) शेवटीं (बुद्धीचिये) पाठीं मातें बांधणें जरी दुवाड.

अर्थ—अर्जुना, कर्मांच्या[१] आरंभीं[१] संकल्पाचे पूर्वीं (आधीं) व (कर्माचें) अंतीं (संकल्पसिद्धीच्या) नंतर मला स्मरणें जर (तुला) अवघड (जात असेल तर–).

तरि हेंही असो । सांडीं माझा अतिसो ।

परि संयतिसीं वसो । बुद्धि तुझी ॥१२७॥

अन्वय—तरि हेंहि असो[१], माझा अतिसो सांडीं[२], परि तुझी बुद्धि संयतिसीं[३] वसो[३].

अर्थ—तर हेंसुद्धां (म्ह० माझें स्मरण ठेवणें व कर्मफल मला अर्पण करणें) असूं[१] दे[१]; माझा आग्रह सोडून[२] दे[२], परंतु तुझी बुद्धि निग्रहाचे[३] ठिकाणीं[३] राहूं[३] दे[३] (म्ह० तूं आपल्या बुद्धींत कर्तृत्वमद व फलास्वाद घेऊं नकोस).

आणि जेणें जेणें वेळें । घडती कर्में सकळें ।

तयांचीं तियें फळें । त्यजितु जाय ॥१२८॥

अन्वय—आणि जेणें जेणें वेळें (जियें) सकळें कर्में घडती (तेणें तेणें वेळें) तयांचीं तियें फळें त्यजितु जाय.

अर्थ—आणि ज्या ज्या वेळीं (जीं जीं) (कांहीं) सर्व कर्में घडतील (शब्दशः –घडतात) (त्या त्या वेळीं) त्यांचीं तीं (सर्व) फळें टाकीत जा.

वृक्ष कां वेली । लोटती फळें आलीं ।

तैसीं सांडीं निपजलीं । कर्में सिद्धें ॥१२९॥

अन्वय—वृक्ष कां वेली आलीं फळें लोटती[१], तैसीं सिद्धें निपजलीं कर्में सांडीं[२].

अर्थ—(ज्याप्रमाणें) झाडें अथवा वेली आलेलीं फळें टाकून[१] देतात[१], त्याप्रमाणें पूर्ण झालेलीं कर्में (तूं) टाकून[२] दे[२].

परि मातें मनीं धरावें । कां मजउद्देशें करावें ।
हें कांहीं नको आघवें । जाऊं दे शून्यीं ॥१३०॥

अन्वय--परि मातें मनीं धरावें, कां मजउद्देशें (कर्म) करावें, हें कांहीं नको, आघवें शून्यीं जाऊं दे.

अर्थ--परंतु मला मनांत बाळगावें (स्मरावें), अथवा मदर्थ (कर्म) करावें, हें कांहींहि नको; (हें) सर्व आकाशांत जाऊं दे (म्ह० निष्फल होऊं दे).

खडकीं जैसें वर्षलें । कां आगीमाजीं पेरिलें ।
कर्म मानीं देखिलें । स्वप्न जैसें ॥१३१॥

अन्वय--जैसें खडकीं वर्षलें[1], कां आगीमाजीं पेरिलें, (कां) जैसें स्वप्न देखिलें (तैसें) कर्म मानीं.

अर्थ--ज्याप्रमाणें खडकावर वृष्टी[1] झाली[1], अथवा अग्निमध्यें (बीं) पेरलें (अथवा) ज्याप्रमाणें स्वप्न पाहिलें (त्याप्रमाणें) कर्म (व्यर्थ अर्थात् निष्फल) समज.

अगा आत्मजेच्या विर्षी । जिवु जैसा निरभिलाषी ।
तैसा कर्मीं अशेषीं । निष्कामु होईं ॥१३२॥

अन्वय--अगा, जैसा जिवु आत्मजेच्या विर्षी निरभिलाषी, तैसा अशेषीं कर्मीं[1] निष्कामु होईं.

अर्थ--अरे (अर्जुना), ज्याप्रमाणें (बापाचा) जीव (म्ह० मन) मुलीच्या संबंधानें कामनारहित (असतो), त्याप्रमाणें सर्व कर्मांच्या[1] ठिकाणीं[1] (तूं) निरिच्छ हो.

वन्हीची ज्वाळा जैशी । वायां जाय आकाशीं ।
क्रिया जिरों दे तैसी । शून्यामाजीं ॥१३३॥

अन्वय-- जैशी वन्हीची ज्वाळा आकाशीं वायां जाय, तैसी क्रिया शून्यामाजीं जिरों[1] दे[1].

अर्थ--ज्याप्रमाणें अग्नीची ज्वाळा आकाशांत व्यर्थ जाते, त्याप्रमाणें

(तुझें) कर्म आकाशामध्यें विलीन[१] (नष्ट) होऊं[१] दे[१] (म्ह० निष्फल होऊं दे).

अर्जुना हा फलत्यागु । आवडे कीर असलगु ।
परि योगामाजीं योगु । धुरेचा हा ॥१३४॥

अन्वय—अर्जुना, हा फलत्यागु असलगु कीर आवडे, परि हा योगु योगामाजीं धुरेचा.

अर्थ—अर्जुना, हा कर्मफलत्याग सोपा खरोखर वाटतो, परंतु हा योग (सर्व) योगांमध्यें अग्रगण्य (आहे).

येणें फलत्यागें सांडे । तें तें कर्म न विरूढे ।
एकचि वेळें वेळुझाडें । वांझें जैसीं ॥१३५॥

अन्वय—येणें फलत्यागें (जें जें) कर्म सांडे[१], तें तें (तैसें) न[२] विरूढे[२], जैसीं वेळुझाडें[३] एकचि वेळें (विऊनी) वांझें (होतीं).

अर्थ–या फलत्यागानें (जें जें) कर्म टाकलें[१] जातें[१] (शब्दशः –टाकतो) तें तें (कर्म) (तसें) वाढीला[२] लागत नाहीं[२] (म्ह० निष्फळ होतें) जशीं वेळूचीं[३] झाडें[३] एकच वेळ (व्याल्यानंतर कायमचीं) फलशून्य (होतात).

तैसें येणेंचि शरीरें । शरीरा येणें सरे ।
किंवहुना येरझारे । चिरा पडे ॥१३६॥

अन्वय—तैसें येणेंचि शरीरें शरीरा येणें सरे, किंवहुना[१] येरझारे चिरा पडे.

अर्थ—त्याप्रमाणें याच शरीरानें शरीराला येणें (म्ह० पुन्हां जन्माला येणें) संपतें, फार[१] काय[१] सांगावें[१], (जन्ममृत्युरूप) येण्याजाण्यावर दगड पडतो (म्ह० जन्ममृत्यूचे फेरे कायमचे बंद पडतात).

पैं अभ्यासाचियां पाउटीं । ठाकिजे ज्ञान किरीटी ।
ज्ञानें येइजे भेटी । ध्यानाचिये ॥१३७॥

अन्वय—किरीटी, अभ्यासाचियां पाउटीं ज्ञान ठाकिजे[१], ज्ञानें ध्यानाचिये भेटी येइजे.

अर्थ—अर्जुना, अभ्यासाच्या पायरीनें ज्ञान (म्ह० परोक्षज्ञान) प्राप्त[1] करून[1] घेण्यांत[1] येतें[1] (अर्थात् प्राप्त होतें), (आणि) ज्ञानानें ध्यानाच्या भेटीला यावें (म्ह० ध्यानाची प्राप्ति होते).

मग ध्यानासि खेंव । देती आघवेचि भाव ।
तेव्हां कर्मजात सर्व । दूरी ठाके ॥१३८॥

अन्वय—मग (जेव्हां) आघवेचि भाव ध्यानासि खेंव देती, तेव्हां सर्व कर्मजात दूरी ठाके.

अर्थ—नंतर (ज्यावेळीं) सर्वच मनोवृत्ति ध्यानाला आलिंगन देतात (म्ह० लीन होतात) त्यावेळीं सर्व कर्मसमुदाय बाजूला राहतो (म्ह० थांवतो).

कर्म जेथ दुरावे । तेथ फलत्यागु संभवे ।
त्यागास्तव आंगवे । शांति सगळी ॥१३९॥

अन्वय—जेथ[1] कर्म दुरावे[2], तेथ[3] फलत्यागु संभवे[4], त्यागास्तव सगळी शांति आंगवे[5].

अर्थ—ज्या[1] ठिकाणीं[1] कर्म दूर[2] रहातें[2] (म्ह० घडत नाहीं अर्थात् थांबतें) त्या[3] ठिकाणीं[3] फलत्याग उत्पन्न[4] होतो[4] (म्ह० आपोआप घडतो); (आणि) फलत्यागामुळें संपूर्ण ब्रह्मस्थिति स्वाधीन[5] (प्राप्त) होते[5].

म्हणोनि यावया शांति । हाचि अनुक्रमु सुभद्रापती ।
म्हणोनि अभ्यासुचि प्रस्तुतीं । करणें एथ ॥१४०॥

अन्वय—सुभद्रापती, म्हणोनि शांति यावया[1] हाचि अनुक्रमु (असे) म्हणोनि एथ[2] प्रस्तुतीं अभ्यासुचि करणें.

अर्थ—अर्जुना, म्हणून ब्रह्म प्राप्त[1] होण्याकरितां[1] हाच क्रम (आहे); एवढ्याकरितां या[2] ठिकाणीं[2] सांप्रत अभ्यासच करणें (तुला योग्य आहे).

अभ्यासाहूनि गहन । पार्था मग ज्ञान ।
ज्ञानापासोनि ध्यान । विशेषिजे ॥१४१॥

अन्वय—पार्था, अभ्यासाहूनि ज्ञान गहन (असे), मग ज्ञानापासोनि ध्यान विशेषिजे[1].

अर्थ—अर्जुना, अभ्यासापेक्षां ज्ञान कठिण (आहे), (आणि) ज्ञानापेक्षां ध्यान श्रेष्ठ[1] मानलें[1] जातें[1].

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥१२॥

मग कर्मफलत्यागु । तो ध्यानापासोनि चांगु ।
त्यागाहूनि भोगु । शांतिसुखाचा ॥१४२॥

अन्वय—मग कर्मफलत्यागु तो ध्यानापासोनि चांगु (असे), त्यागाहूनि शांतिसुखाचा भोगु (चांगु असे).

अर्थ—मग कर्मफलत्याग हा ध्यानापेक्षां चांगला (आहे), (आणि) कर्मफलत्यागापेक्षां ब्रह्मसुखाचा अनुभव (श्रेष्ठ आहे).

ऐसिया या वाटा । इहींचि पेणां सुभटा
शांतीचा माजिवटा । ठाकिला जेणे ॥१४३॥

अन्वय—सुभटा, ऐसिया या वाटा, इहींचि पेणां जेणे शांतीचा माजिवटा ठाकिला[1].

अर्थ—सुवीरा (अर्जुना), अशा या मार्गानें, (त्यांतील वर सांगितलेल्या) ह्याच टप्प्यांनीं ज्यानें शांतीचा गाभा प्राप्त[1] करून[1] घेतला[1].

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥१३॥

जो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेचि कहीं ।
आपपरु नाहीं । चैतन्या जैसा ॥१४४॥

अन्वय—जो सर्व भूतांच्या ठायीं द्वेषातें कहीं नेणेचि[1], जैसा चैतन्या आपपरु[2] नाहीं (तैसा जया नाहीं).

अर्थ—जो सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं द्वेषाला कधींहि जाणतच[1] नाहीं[1], ज्याप्रमाणें चैतन्याला " (हा) आपला[2] (व हा) दुसऱ्याचा[2] " असा[2] भेद[2] नाहीं (त्याप्रमाणें ज्याला आपपरभाव नसतो).

उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे ।
हें कांहींच नेणिजे । वसुधा जेवीं ॥१४५॥

अन्वय—उत्तमातें धरिजे[1], अधमातें अव्हेरिजे[2] हें कांहींच जेवीं वसुधा नेणिजे[3].

अर्थ—चांगल्याला धारण[1] करावें[1] (व) नीचाला टाकून[2] द्यावें[2], हें मुळींच ज्याप्रमाणें पृथ्वी जाणत[3] नाहीं[3] (शब्दशः—पृथ्वीकडून जाणलें जात नाहीं).

कां रायाचे देह चाळूं । रंका परौतें गाळूं ।
हें न म्हणेचि कृपाळु । प्राणु पैं गा ॥१४६॥

अन्वय—गा (अर्जुना), कां रायाचे देह चाळूं (आणि) रंका परौतें गाळूं, हें कृपाळू प्राणु न म्हणेचि.

अर्थ—अरे (अर्जुना), अथवा राजाचें शरीर (तेवढें मीं) वागवावें (आणि) दरिद्र्याला पलीकडे (बाजूस) टाकावें, असें दयाळू प्राण म्हणतच नाहीं (अर्थात् जाणतच नाहीं).

गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं ।
ऐसें नेणेचि का करूं । तोय जैसें ॥१४७॥

अन्वय—गाईची तृषा हरूं[1], कां व्याघ्रा विष होऊनि मारूं, ऐसें करूं जैसें तोय नेणेचि[1].

अर्थ—गाईची तहान (मी) नाहींशी[1] करीन[1], अथवा वाघाला (मात्र) विष होऊन मारीन, असें करण्यास जसें पाणी जाणतच[2] नाहीं[2].

तैसी आघवियांचि भूतमात्रीं । एकपणें जया मैत्री ।
कृपेशीं धात्री । आपणचि जो ॥१४८॥

अन्वय—तैसी एकपणें[1] आघवियांचि भूतमात्रीं[2] जया मैत्री (असे) जो आपणचि कृपेशीं धात्री (असे).

अर्थ—त्याप्रमाणें एकपणाच्या[1] बोधानें[1] सर्व प्राणिमात्रांचें[2] ठिकाणीं[2] ज्याचा स्नेह (असतो), जो स्वतःच कृपेची जन्मभूमि (उत्पत्तिस्थान)

(असतो).

आणि मी तूं हे भाष नेणे । माझें कांहींचि न म्हणे ।
सुख दुःख जाणणें । नाहीं जया ॥१४९॥

अन्वय—आणि मी तूं हे भाष नेणे[1], (जो) कांहींचि[2] माझें न म्हणे, जया सुख दुःख जाणणें नाहीं.

अर्थ—आणि (जो) मी तूं ही भाषा जाणत[1] नाहीं[1]; (जो) कोणतीहि[2] वस्तु[2] 'माझी' (असें) म्हणत नाहीं. ज्याला सुखाची (व) दुःखाची जाणीव नसते.

तेवींची क्षमेलागीं । पृथ्वीसि पवाडु आंगीं ।
संतोषा उत्संगीं । दिधलें घर ॥१५०॥

अन्वय—तेवींचि क्षमेलागीं (जया) आंगीं[1] पृथ्वीसि पवाडु (असे) संतोषा (जेणें) उत्संगीं घर दिधलें.

अर्थ—तसेंच सहनशीलतेसंबंधीं (ज्याच्या) स्वतःचे[1] ठिकाणीं[1] पृथ्वीची थोरवी (म्ह० योग्यता) (असते), (आणि) तृप्तीला (ज्यानें आपल्या) मांडीवर स्थान दिलें (म्ह० आश्रय दिला आहे).

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१४॥

वार्षियेवीण सागरु । जैसा जळें नित्य निर्भरु ।
तैसा निरुपचारु । संतोषी जो ॥१५१॥

अन्वय—जैसा वार्षियेवीण सागरु जळें नित्य निर्भरु[1] (असे), तैसा जो निरुपचारु संतोषी (असे).

अर्थ—ज्याप्रमाणें वर्षाऋतुशिवाय (अर्थात् पावसाळ्याविना) समुद्र पाण्यानें नेहमीं पूर्ण[1] भरलेला[1] (असतो), त्याप्रमाणें जो निर्निमित्त (अर्थात् बाह्य सुखसाधनांवाचून) आनंदी (असतो).

वाहूनि आपुली आण । धरी जो अंतःकरण ।
निश्चया साचपण । जयाचेनि ॥१५२॥

अन्वय--जो आपुली आण वाहूनि अंतःकरण धरी[१], जयाचेनि निश्चया साचपण (असे).

अर्थ--जो आपली शपथ घालून अंतःकरण ताब्यांत[१] ठेवतो[१], (आणि) ज्याच्यामुळें निश्चयाला खरेपणा (असतो).

जीवु परमात्मा दोन्ही । बैसले ऐक्यासनीं ।
जयाचिया हृदयभुवनीं । विराजती ॥१५३॥

अन्वय--जयाचिया हृदयभुवनीं[१] जीवु परमात्मा दोन्ही ऐक्यासनीं[१] बैसले विराजती[२].

अर्थ--ज्याच्या अंतःकरणरूपी[१] घरांत[१] जीवात्मा (व) परमात्मा (असे) दोघे ऐक्यरूपी[१] आसनावर[१] बसलेले शोभत[२] आहेत[२] (म्ह० ज्याच्या ठिकाणीं जीवशिवाचें ऐक्य झालेलें आहे).

ऐसा योगसमृद्धी । होऊनि जो निरवधि ।
अर्पी मनोबुद्धि । माझ्या ठायीं ॥१५४॥

अन्वय--योगसमृद्धी[१] ऐसा[२] होऊनि जो मनोबुद्धि[३] माझ्या ठायीं निरवधि अर्पी[४].

अर्थ--ऐक्यरूपी[१] योगाच्या[१] उत्कटतेनें[१] अशा[२] प्रकारचा[२] होऊन जो मन[३] (व) बुद्धि[३] माझ्या ठिकाणीं अखंड अर्पण[४] करतो[४].

आंतु बाहेरि योगु । निर्वाळलेयाही चांगु ।
तरि माझा अनुरागु । सप्रेम जया ॥१५५॥

अन्वय--(जरि) आंतु बाहेरी योगु चांगु[१] निर्वाळलेयाहि[२] तरि जया माझा सप्रेम अनुरागु (असे).

अर्थ--(जरि) आंत (व) बाहेर योग चांगल्या[१] प्रकारें[१] शुद्ध[२] बाणलेला[२] असला[२] तरी ज्याला माझी प्रेमपूर्वक निष्ठा (असते).

अर्जुना गा तो भक्तु । तोचि योगी तोचि मुक्तु ।
तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये ॥१५६॥

अन्वय--गा अर्जुना, तो भक्तु, तोचि योगी, तोचि मुक्तु; तो वल्लभा[१]

मी कांतु, ऐसा पढिये.

अर्थ--अरे अर्जुना, तो भक्त, तोच योगी (व) तोच मुक्त (होय) ‘ तो आवडती[१] पत्नी[१] (व) मी पती, असा (तो मला) आवडतो. ’

हें ना तो आवडे । मज जीवाचेनि पाडें ।
हेंही एथ थोकडें । रूप करणें ॥१५७॥

अन्वय--हें ना, तो मज जीवाचेनि पाडें आवडे, हेंहि रूप करणें एथ थोकडें (असे).

अर्थ--एवढेंच नाहीं, तो मला जिवाच्या बरोबरीनें (म्ह० जिवासारखा) आवडतो, हेंसुद्धां वर्णन करणें याठिकाणीं कोतें (पडतें).

तरि पढियंतेयाची कहाणी । हे भुलीची भारणी ।
इये तंव न बोलणीं । परि बोलवी श्रद्धा ॥१५८॥

अन्वय--तरि पढियंतेयाची कहाणी, हे भुलीची[१] भारणी (असे), इये तंव न[२] बोलणीं[२], परि श्रद्धा बोलवी[३].

अर्थ--तथापि लाडक्याची कथा (सांगणें) ही भुरळ[१] (म्ह० मोह) पाडणारी[१] मोहनी (आहे); ह्या तर बोलण्यासारख्या[२] गोष्टी[२] नाहींत[२], परंतु (तुझें) प्रेम (मला या गोष्टी) बोलावयास[३] लावतें[३].

म्हणोनि गा आम्हां । वेगा आली उपमा ।
एऱ्हवीं काय प्रेमा । अनुवादु असे ॥१५९॥

अन्वय--गा (अर्जुना), म्हणोनि आम्हां उपमा वेगा आली, एऱ्हवीं प्रेमा काय अनुवादु असे.

अर्थ--अरे (अर्जुना), म्हणून आम्हांला (हा) दृष्टान्त चटकन सुचला; नाहींतर (या) प्रेमाला काय बोलणें असतें.

आतां असो हें किरीटी । पैं प्रियाचिया गोष्टी ।
दुणा थांव उठी । आवडी गा ॥१६०॥

अन्वय--गा किरीटी, आता ह असो[१], प्रियाचिया गोष्टी आवडी दुणा थांव उठी.

अर्थ--अरे अर्जुना, आतां हें असूं[1] दे ; प्रियकराच्या गोष्टीनें प्रेमाला दुप्पट वळ चढतें.

तयाही वरी विपायें । प्रेमळु संवादिया होये ।
तिये गोडीसी आहे । कांटाळें मग ॥१६१॥

अन्वय--तयाही वरी, विपायें प्रेमळु संवादिया[1] होये, मग तिये गोडीसी कांटाळें आहे.

अर्थ--त्यांतही अधिक, कदाचित् प्रेमळ चर्चा[1] करणारा[1] (एखादा) मिळाला, तर त्या गोडीला माप आहे (काय) ?

म्हणोनि गा पांडुसुता । तूंचि प्रियु आणि तूंचि श्रोता ।
वरि प्रियाची वार्ता । प्रसंगें आली ॥१६२॥

अन्वय--गा पांडुसुता, म्हणोनि तूंचि प्रियु आणि तूंचि श्रोता, वरि प्रसंगें प्रियाची वार्ता आली.

अर्थ--अरे अर्जुना, म्हणून तूंच आवडता आणि तूंच श्रोता, आणखी (या) प्रसंगानें प्रेमळाचीच गोष्ट निघाली (म्ह० बोलण्याचा विषय झाली).

तरि आतां बोलों । भलेया सुखा मीनलों ।
ऐसें म्हणतखेंवीं डोलों । लागले देवो ॥१६३॥

अन्वय--तरि आतां बोलों, भलेया सुखा मीनलों[1], ऐसें म्हणतखेंवीं देवो डोलों लागले.

अर्थ--तर आतां (आम्ही) बोलतों; 'मोठ्या आनंदाला (आम्ही) प्राप्त[1] झालों[1] (आहोंत)', असें म्हणतांक्षणींच देव डोलूं लागले.

मग म्हणे जाण । तया भक्ताचें लक्षण ।
जया मी अंतःकरण । बैसों घालीं ॥१६४॥

अन्वय--मग म्हणे, जया मी (आपुलें) अंतःकरण बैसों घालीं, तया भक्ताचें लक्षण जाण[1].

अर्थ-- मग म्हणाले, " ज्याला मी (आपलें) हृदय बसावयास घालतों; त्या भक्ताचें चिन्ह समजून[1] घे[1]. "

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥१५॥

तरि सिंधूचेनि माजें । जळचरां भय नुपजे ।
आणि जळचरीं नुबुजे । समुद्रु जैसा ॥१६५॥

अन्वय—तरि जैसा सिंधूचेनि माजें जळचरां[1] भय नुपजे[2], आणि जळचरीं समुद्र नुबुजे[3].

अर्थ—तर ज्याप्रमाणें समुद्राच्या भरतीनें पाण्यांतील[1] प्राण्यांना[1] भय उत्पन्न[2] होत[2] नाहीं[2] (म्ह० वाटत नाहीं), आणि जळचरांमुळें समुद्र घाबरत[3] नाहीं[3].

तेविं उन्मत्तें जगें । जयासि खंती न लगे ।
आणि जयाचेनि आंगें । न शिणे लोकु ॥१६६॥

अन्वय—तेविं जयासि उन्मत्तें जगें खंती न लगे, आणि जयाचेनि आंगें लोकु न[1] शिणे[1].

अर्थ—त्याप्रमाणें ज्याला मस्त जगामुळें (म्ह० लोकांमुळें) खेद होत नाहीं, आणि ज्याच्या योगानें लोकांना त्रास होत[1] नाहीं[1].

किंबहुना पांडवा । शरीर जैसें अवयवां ।
तैसा नुबगे जीवां । जीवपणें जो ॥१६७॥

अन्वय—पांडवा, किंबहुना[1], जैसें शरीर अवयवां नुबगे[2], तैसा जो जीवपणें जीवां (नुबगे).

अर्थ—अर्जुना, फार[1] काय[1] सांगावें[1], ज्याप्रमाणें शरीर (आपल्या) अवयवांना कंटाळत[2] नाहीं[2], त्याप्रमाणें जो जीवपणानें (म्ह० आपणच सर्वांचा प्राण असल्यामुळें अर्थात् भूतात्मभावामुळें) प्राण्यांना (कंटाळत नाहीं).

जगचि देह जाहलें । म्हणोनि प्रियाप्रिय गेलें ।
हर्षामर्ष ठेले । दुजेनविण ॥१६८॥

अन्वय—जगचि देह जाहलें, म्हणोनि प्रियाप्रिय[1] गेलें[2] (आणि) दुजे-

नविण हर्षामर्ष[३] ठेले.

अर्थ—जगच (ज्याचें) शरीर झालें (व) म्हणून (अमुक) आवडतें[१] (व) (अमुक) नावडतें (हें) नष्ट[२] झालें[२]; (आणि) दुसऱ्यावांचून (म्ह० द्वैताभावामुळें) आनंद[३] (व) क्रोध[३] (हेहि) (ज्याच्या ठिकाणीं) लोपले (म्ह० नष्ट झाले).

ऐसा द्वंद्वनिर्मुक्तु । भयोद्वेगरहितु ।
याही वरि भक्तु । माझ्या ठायीं ॥१६९॥

अन्वय—ऐसा द्वंद्वनिर्मुक्तु[१] भयोद्वेगरहितु[२] याही वरि माझ्या ठायीं भक्तु[३] (असे).

अर्थ—असा (सुखदुःखादि) द्वंद्वांपलीकडे[१] असलेला[१] (व) भय[२] (आणि) खिन्नता[२] यांपासून[२] मुक्त[२] (आणि) यांच्याहि भरतीला (म्ह० इतकें असून शिवाय) माझ्या ठिकाणीं (जो) भक्ति[३] करणारा[३] (असतो).

तरि तयाचा गा मज मोहो । काय सांगों तो पढियावो ।
हें असो जीवें जीवो । माझेनि तो ॥१७०॥

अन्वय—गा, तरि मज तयाचा मोहो (असे), तो पढियावो काय सांगों, हें असो[१], तो माझेनि जीवें जीवो[२].

अर्थ—अरे (अर्जुना), म्हणून मला त्याची माया (असते), ती आवड काय सांगू ! हें राहूं[१] दे[१]. तो माझ्या प्राणानेंच जिवंत[२] राहो[२] (म्ह० माझ्या जीवाचा तो जीवच आहे).

जो निजानंदें धाला । परिणामु आयुष्या आला ।
पूर्णते जाहला । वल्लभु जो ॥१७१॥

अन्वय—जो निजानंदें धाला[१], परिणामु आयुष्या आला, (जो) पूर्णते वल्लभु जाहला.

अर्थ—जो आत्मानंदानें तृप्त[१] झाला[१], ब्रह्मच (ज्याच्या रूपानें) जन्मास आलें (आहे), जो पूर्णावस्थेचा प्रियपति झाला.

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १६ ॥

जयाचिया ठायीं पांडवा । अपेक्षे नाहीं रिगावा ।

सुखासि चढावा । जयाचें असणें ॥१७२॥

अन्वय--पांडवा, जयाचिया ठायीं अपेक्षे रिगावा नाहीं, जयाचें असणें सुखासि चढावा (असे).

अर्थ--अर्जुना, ज्याच्या ठिकाणीं इच्छेचा प्रवेश नसतो, ज्याचें अस्तित्व (म्हणजे) सुखाची वाढ (होय).

मोक्ष देऊनि उदार । काशी होय कीर ।

परि वेंचणें लागे शरीर । तिये गांवीं ॥१७३॥

अन्वय--काशी मोक्ष देऊनि उदार होय कीर, परि तिये गांवीं शरीर वेंचणें लागे.

अर्थ--काशी मोक्ष देण्यांत (देण्याइतकी) उदार असते खरी, परंतु त्या गांवांत (म्ह० काशींत) शरीर वेंचावें लागतें (म्ह० मरावें लागतें).

हिमवंतु दोष खाये । परि जीविताची हानि होये ।

तैसें शुचित्व नोहे । सज्जनाचें ॥१७४॥

अन्वय--हिमवंतु दोष खाये[1], परि जीविताची हानि होये, तैसें सज्जनाचें शुचित्व नोहे.

अर्थ--हिमालय पाप नाहींसें[1] करतो[1], परंतु (त्यांत) प्राणाचाहि नाश होतो; त्याप्रकारचा साधूचा पवित्रपणा नसतो.

शुचित्वें शुचि गांग होये । आणि पाप तापही जाये ।

परि तेथें आहे । बुडणें एक ॥१७५॥

अन्वय--गांग[1] शुचित्वें शुचि होये, आणि (तेणें) पाप तापही जाये[2] परी तेथें[3] बुडणें[3] एक आहे.

अर्थ--गंगेचें[1] पाणी[1] (आंगच्या) पवित्रपणामुळें पवित्र असतें, आणि (म्हणून) (त्याचे योगानें) पाप (व त्रिविध) तापसुद्धां नाहींसे[2] होतात[2]; परंतु त्या[3] ठिकाणीं[3] देह[4] टाकणें[3] (म्ह० बुडून मरणें) (ही) एक (गोष्ट आवश्यक) असते.

खोलिये पारु नेणिजे । तरी भक्तीं न बुडिजे ।
रोकडाचि लाहिजे । न मरतां मोक्षु ॥१७६॥

अन्वय—भक्तीं[1] खोलिये पारु नेणिजे[2], तरी न बुडिजे, न मरतां मोक्षु रोकडाचि लाहिजे[3].

अर्थ—भक्ताच्या[1] ठिकाणीं[1] खोलीचा (गांभीर्याचा) अंत समजत[2] नाहीं.[2] तरी (त्याचा उपासक) बुडत नाहीं (आणि त्याला) न मरतां (म्ह० जिवंतपणींच) मोक्ष प्रत्यक्ष प्राप्त[3] होतो[3].

संताचेनि अंगल्गें । पापातें जिणणें गंगे ।
तेणें संतसंगे । शुचित्व कैसें ॥१७७॥

अन्वय—संताचेनि अंगलगें गंगे पापातें जिणणें[1] तेणें संतसंगें शुचित्व कैसें ?

अर्थ—संताच्या शरीरस्पर्शानें गंगेकडून पापाला जिंकलें[1] जातें[1] (शब्दशः—जिंकणें होतें) त्या संतसंगतीनें (येणारें) पावित्र्य कसें (उच्च प्रतीचें असेल) ?

म्हणोनि असो जो ऐसा । शुचित्वें तीर्थां कुवासा ।
जेणें उल्लंघविले दिशा । मनोमळ ॥१७८॥

अन्वय—म्हणोनि असो[1], ऐसा[2] जो शुचित्वें तीर्थां कुवासा (असे) जेणें मनोमळ[3] दिशा उलंघविले[4].

अर्थ—म्हणून राहूं[1] दे[1], अशा[2] प्रकारचा[2] जो (भक्त) पावित्र्यामुळें तीर्थांना आश्रय (असतो), (आणि) ज्यानें मनांतील[3] पातकांना[3] दिशांच्या पलीकडे[4] पळवून[4] लाविलें[4].

आंतु बाहेरि चोखाळु । सूर्य जैसा निर्मळु ।
आणि तत्त्वार्थींचा पायाळु । देखणा जो ॥१७९॥

अन्वय—जैसा सूर्य आंतु बाहेरि निर्मळु (तैसा जो) आतु बाहेरि चोखाळु (असे) आणि जो तत्त्वार्थीचा[1] पायाळु देखणा (असे).

अर्थ—जसा सूर्य आंत बाहेर शुद्ध (असतो) (त्याप्रमाणें जो मनानें

व शरीरानें) शुद्ध (असतो); आणि जो ब्रह्मरूपी (भूमिगत) धनाचा[१] पायाळू (मनुष्याप्रमाणें) पाहणारा (असतो).

व्यापक आणि उदास । जैसें कां आकाश ।
तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ॥१८०॥

अन्वय--गा (अर्जुना), आकाश जैसें व्यापक आणि उदास, तैसें जयाचें मानस सर्वत्र (व्यापक आणि उदास असे).

अर्थ— अरे (अर्जुना), आकाश ज्याप्रमाणें सर्वव्यापी असूनहि आलिप्त (असतें) त्याप्रमाणें ज्याचें मन सर्वत्र (आत्मभाव बाळगूनहिं निरपेक्ष असतें).

संसारव्यथे फिटला । जो नैराश्यें विनटला ।
व्याधाहातोनि सुटला । विहंगु जैसा ॥१८१॥

अन्वय--जो नैराश्यें विनटला[१] (म्हणूनि) संसारव्यथे फिटला[२]; जैसा व्याधाहातोनि[३] सुटला विहंगु–

अर्थ--जो निरिच्छतेनें भूषित[१] झाला[१] (सिद्ध झाला) (म्हणून) संसारक्लेशांतून मुक्त[२] झाला[२]; ज्याप्रमाणें पारध्याच्या[३] हातून[३] सुटलेला पक्षी– (दुःखमुक्त होऊन आनंदी होतो तसा तो झाला).

तैसा सतत जो सुखे । कोणींही टवंच न देखे ।
नेणिजे गतायुषें । लज्जा जेवीं ॥१८२॥

अन्वय—तैसा सतत जो सुखे[१], जेवीं गतायुषें[२] लज्जा नेणिजे[३] (तेवीं जो) कोणीहि टवंच[३] न देखे.

अर्थ--त्याप्रमाणें नेहमीं जो सुखी[१] असतो[१]; ज्याप्रमाणें मेलेला[२] मनुष्य[२] लाज जाणत[३] नाहीं[३]. (त्याप्रमाणें जो) कसलेंही मानसिक[३] दुःख[३] जाणत नाहीं.

आणि कर्मारंभालागीं । जया अहंकृतीं नाहीं आंगीं ।
जैसा निरिंधन आगी । विझोनि जाय ॥१८३॥

अन्वय--आणि जया आंगीं कर्मारंभालागीं[१] अहंकृती नाहीं, जैसा

निरिंधन आगी विझोनि जाय.

अर्थ---आणि ज्याच्या ठिकाणीं कर्म[1] करण्याविषयीं[0] अहंकार नसतो, ज्याप्रमाणें काष्ठरहित अग्नि विझून जातो---

तैसा उपशमुचि भागा । जयासि आला पैं गा ।
जो मोक्षाचिया आंगा । लिहिला असे ॥१८४॥

अन्वय---गा (अर्जुना), तैसा उपशमुचि[1] जयासि भागा आला; जो (उपशमु) मोक्षाचिया आंगा लिहिला असे.

अर्थ---अरे (अर्जुना), त्याप्रमाणें (अहंकाराच्या अभावामुळें) मनाची[1] शांतिच[1] ज्याच्या वाट्याला आली (आहे); जी (शांति) मोक्षाच्या खात्याला (बाजूला) लिहिलेली असते (म्ह० जिनें मोक्ष निश्चित मिळतो).

अर्जुना हा ठावोवरी । सोहंभावो सरोभरी ।
द्वैताच्या पैल्तीरीं । निगों सरला ॥१८५॥

अन्वय---अर्जुना, हा ठावोवरी सोहंभावो सरोभरी[1] द्वैताच्या पैल-तीरीं[2] निगों सरला[3].

अर्थ---अर्जुना, या मर्यादेपर्यंत (येण्याइतका) सोहंभाव (म्ह० ब्रह्मैक्य-भाव) (अंगांत) पूर्ण[1] भरल्यामुळें[1] (तो) द्वैताच्या पलीकडील[2] तीरावर[2] उतरण्यास समर्थ[3] झाला[3].

कीं भक्तिसुखालागीं । आपणपेंचि दोहीं भागीं ।
वांटूनिया आंगीं । सेवकै बाणी ॥१८६॥

अन्वय---कीं भक्तिसुखालागीं आपणपेंचि दोहीं भागीं वांटूनिया आंगीं[1] सेवकै बाणी[2].

अर्थ--- तथापि भक्तिसुखाकरितां आपणालाच दोन (म्ह० देव व भक्त अशा) भागांत वाटून आपल्या[1] (भागाचे) ठिकाणीं[1] सेवकपणा धारण[2] करतो[2].

येरा नाम मी ठेवी । मग भजती वोज बरवी ।
न भजतया दावी । योगिया जो ॥१८७॥

अन्वय—येरा (भागा) मी नाम ठेवी (आणि) मग जो न भजतया योगिया भजती बरवी वोज दावी.

अर्थ-- दुसऱ्या (भागाला) मी (म्ह० कृष्ण अर्थात् देव असें) नांव ठेवतो (आणि) नंतर जो न भजणाऱ्या (म्ह० भक्ति न करणाऱ्या) योग्याला भजनाची (भक्ति करण्याची) चांगली रीत दाखवितो.

तयाचें आम्हां व्यसन । आमुचें तो निजध्यान ।
किंबहुना समाधान । तो मिळे तैं ॥ १८८ ॥

अन्वय—आम्हां तयाचें व्यसन, तो आमुचें निजध्यान[१], किंबहुना[२] (जैं) तो मिळे तैं समाधान (असें).

अर्थ—आम्हांला त्याचा छंद (असतो), तो आमचा स्वतःच्या[१] ध्यानाचा[१] विषय[१] (असतो), फार[२] काय[२] सांगावें[२], (जेव्हां) तो भेटतो तेव्हांच (आमच्या मनाला) समाधान (होतें).

तयालागीं मज रूपा येणें । तयाचेनि मज एथें असणें ।
तया लोण कीजे जीवें प्राणें । ऐसा पढिये ॥ १८९ ॥

अन्वय--मज तयालागीं रूपा येणें[१], तयाचेनि मज एथें असणें[२], तया जीवें प्राणें लोण कीजे, ऐसा पढिये.

अर्थ--मला त्याच्याकारितां (सगुण-साकार) रूपाला यावें[१] लागतें[१] (म्ह० अवतार घ्यावा लागतो), त्याच्यामुळें मला येथें (म्ह० पृथ्वीवर) राहावें[२] लागतें[२], त्याच्यावरून जीव (आणि) प्राण उतरून (ओवाळून) टाकावे, इतका (तो मला) आवडतो.

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १७ ॥

जो आत्मलाभासारिखें । गोमटें कांहींचि न देखे ।
म्हणोनि भोगविशेखें । हरिखेजेना ॥ १९० ॥

अन्वय--जो आत्मलाभासारिखें[१] कांहींचि गोमटें न देखे, म्हणोनि भोगविशेखें[२] हरिखेजेना[३].

अर्थ--जो ब्रह्मप्राप्तीच्या[१] तोडीचें[१] कांहींच चांगलें पाहत (अर्थात् मानीत) नाहीं, म्हणून (जो) भोगांच्या[२] आधिक्यानें[२] (अथवा विशिष्ट भोगांनीं म्ह० श्रेष्ठ विषयसुखांनीं) हुरळून[३] जात[३] नाहीं[३].

आपणचि विश्व जाहला । तरि भेदभावो सहजाचि गेला ।
म्हणोनि द्वेषु ठेला । जया पुरुषा ॥ १९१ ॥

अन्वय—आपणचि विश्व जाहला, तरि भेदभावो सहजाचि गेला[1], म्हणोनि जया पुरुषा द्वेषु ठेला.

अर्थ--स्वतःच जग बनला, म्हणून भिन्नत्वभावना (म्ह० द्वैतबुद्धि) आपोआपच नष्ट[1] झाली[1] (व) म्हणून ज्या पुरुषाचा द्वेष (पूर्णपणें) राहिला (अर्थात् नष्ट झाला).

पैं आपुलें जें साचें । तें कल्पांतींही न वचे ।
हें जाणोनि गताचें । न शोची जो ॥ १९२ ॥

अन्वय--जें साचें आपुलें (असे), तें कल्पांतींही[1] न[2] वचे[2], हें जाणोनि जो गताचें न[3] शोची[3].

अर्थ--जें खरेंच आपुलें (असतें), तें कल्पाच्या[1] शेवटीं[1] सुद्धां[1] नष्ट[2] होत[2] नाहीं[2], असें जाणून (म्ह० ध्यानीं घेऊन) जो गेलेल्याचें दुःख[3] करीत[3] नाहीं[3].

आणि जयापरौतें कांहीं नाहीं । तें आपणपेंचि आपुल्या ठायीं ।
जाहला यालागीं जो कांहीं । आकांक्षी ना ॥ १९३ ॥

अन्वय--आणि जयापरौतें[1] कांहीं नाहीं, तें आपणपेंचि आपुल्या ठायीं जाहला, यालागीं जो कांहीं आकांक्षी[1] ना[1].

अर्थ-- आणि ज्याच्या[1] पलीकडे[1] कांहींच (श्रेष्ठ) नाहीं, तें (ब्रह्म) आपणच (म्ह० स्वतःच) स्वतःच्याच ठिकाणीं (जो) झाला, (व) म्हणून जो कांहींच (म्ह० कशाचीच) इच्छा[1] करीत[1] नाहीं[1].

वोखटें कां गोमटें । हें कांहींचि तया नुमटे ।
रात्रिदिवस न घटे । सूर्यासि जेवीं ॥ १९४ ॥

अन्वय--जेवीं सूर्यासि रात्रिदिवस[1] न घटे, (तेवीं) तया वोखटें कां गोमटें हें कांहींचि नुमटे[2].

अर्थ--ज्याप्रमाणें सूर्याला रात्र[1] (व) दिवस[1] (यांतलें कांहींच) घडत नाहीं, (त्याप्रमाणें) त्याला (म्ह० भक्ताला) वाईट किंवा चांगलें हें कांहींच दिसत[2] नाहीं[2] (म्ह० यांना तो भिन्नत्वानें पाहात नाहीं).

ऐसा बोधुचि केवळु । जो होऊनि असे निष्कळु ।
त्याहीवरी भजनशीळु । माझ्या ठायीं ॥ १९५ ॥

अन्वय—ऐसा जो केवळु बोधुचि होऊनि निष्कळु असे, (व) त्याहीवरी[1] माझ्या ठायीं भजनशीळु (असे).

अर्थ—असा जो निखळ ज्ञानरूपच होऊन पूर्ण असतो, व त्यांत[1] आणखी[1] माझ्या ठिकाणीं भजनशील (असतो) (म्ह० नित्य माझें भजन करतो).

तरि तया ऐसें दुसरें । आम्हां पढियंतें सोयरें ।
नाहीं गा साचोकारें । तुझी आण ॥ १९६ ॥

अन्वय—गा (अर्जुना), तरि साचोकारें आम्हां तया ऐसें पढियंतें दुसरें सोयरें नाहीं, तुझी आण (वाहतसें).

अर्थ—अरे (अर्जुना), तरी खरोखर आम्हांला त्याच्या सारखा (अर्थात् त्याच्या तोडीचा) आवडता दुसरा नातलग नाहीं, तुझीच शपथ (वाहतों).

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥ १८॥

पार्था जयाचिया ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं ।
रिपुमित्रां दोहीं । सरिसा पाडु ॥ १९७ ॥

अन्वय—पार्था, जयाचिया ठायीं वैषम्याची वार्ता नाहीं, (आणि) रिपुमित्रां[1] दोहीं पाडु सरिसा (असे).

अर्थ—अर्जुना, ज्याच्या ठिकाणीं विषमतेची गोष्ट नसते, (आणि ज्याच्या ठिकाणीं) शत्रु[1] (आणि) मित्र[1] (या) दोघांची किंमत सारखीच (असते).

कां घरींचियां उजियेडु करावा । पारखियां आंधारु पाडावा ।
हें नेणेचि गा पांडवा । दीपु जैसा ॥ १९८ ॥

अन्वय—गा पांडवा, जैसा दीपु घरींचियां[1] उजियेडु करावा, कां पारखियां आंधारु पाडावा, हें नेणेचि[2].

अर्थ—अरे अर्जुना, ज्याप्रमाणें दिवा घरच्या[1] लोकांना[1] प्रकाश करावा, अथवा परकीयांना अंधार करावा, हें जाणतच[2] नाहीं[2].

जो खांडावया घावो घाली । कां लावणी जयानें केली ।
दोघां एकचि साउली । वृक्षु दे जैसा ॥ १९९ ॥

अन्वय---जैसा वृक्षु जो खांडावया घावो घाली, कां लावणी जयानें केली, (यां) दोघां एकचि साउली दे.

अर्थ---ज्याप्रमाणें झाड, जो तोडण्याकरितां प्रहार करितो, अथवा (त्याची) लागवड ज्यानें केली, (अशा) दोघांना सारखीच साउली देतें.

नातरी इक्षुदंडु । पाळितया गोडु ।
गाळितया कडु । नोहेचि जेवीं ॥ २०० ॥

अन्वय---नातरी जेवीं इक्षुदंडु पाळितया गोडु (आणि) गाळितया[1] कडु नोहेचि[2].

अर्थ---अथवा ज्याप्रमाणें ऊंस वाढविणाऱ्यास (चवीला) गोड (व) पिळून[1] काढणाऱ्यास[1] कडु होत[2] नाहीं[2].

अरिमित्रीं तैसा । अर्जुना जया भावो ऐसा ।
मानापमानीं सरिसा । होतु जाय ॥ २०१ ॥

अन्वय---अर्जुना, तैसा अरिमित्रीं[1] जया ऐसा भावो (असे), (आणि) मानापमानीं[2] (जो) सरिसा होतु जाय.

अर्थ---अर्जुना, तसाच शत्रुमित्रांच्या[1] ठिकाणीं[1] ज्याचा असा समभाव (असतो), (आणि) मान[2] (व) अपमानांचे[2] बाबतींत[2] जो सारखा होत जातो (म्ह० सारखेच मानतो).

तिहीं ऋतूं समान । जैसें कां गगन ।
तैसें एकचि मान । शीतोष्णीं जया ॥ २०२ ॥

अन्वय---जैसें गगन तिहीं ऋतूं समान (असे), तैसें जया शीतोष्णीं[1] एकचि मान (असे).

अर्थ---ज्याप्रमाणें आकाश तिन्हीं ऋतूंमध्यें सारखें (असतें), त्याप्रमाणें ज्याला थंड[1] (व) उष्ण[1] यांच्यासंबंधानें[1] एकच गणती (म्ह० किंमत) (असते).

दक्षिण उत्तर मारुता । मेरु जैसा पांडुसुता ।

तैसा सुखदुःखां प्राप्तां । मध्यस्थु जो ॥ २०३ ॥

अन्वय--पांडुसुता, जैसा मेरु दक्षिण उत्तर मारुता (मध्यस्थु असे), तैसा जो प्राप्तां[१] सुखदुःखां मध्यस्थु (असे).

अर्थ--अर्जुना, ज्याप्रमाणें मेरु (पर्वत) दक्षिण—उत्तर (म्ह० दक्षिणेकडच्या व उत्तरेकडच्या) वाऱ्याला (वाऱ्याच्या बाबतींत) (उदासीन असतो), त्याप्रमाणें जो प्राप्त[१] झालेल्या[१] सुखदुःखांविषयीं तटस्थ (म्ह० उदासीन) (असतो).

माधुर्यें चंद्रिका । सरिसी राया रंका ।
तैसा जो सकळिकां । भूतां समु ॥ २०४ ॥

अन्वय--(जैसी) चंद्रिका माधुर्यें राया रंका सरिसी (असे), तैसा जो सकळिकां भूतां समु (असे).

अर्थ--(ज्याप्रमाणें) चांदणें आल्हादकत्वानें राजाला (व) भिकाऱ्याला सारखेंच (असतें), त्याप्रमाणें जो सगळ्या प्राण्यांना सारखाच (आल्हादकारक असतो).

आघविया जगा एक । सेव्य जैसें उदक ।
तैसें तयातें तिन्ही लोक । आकांक्षिती ॥ २०५ ॥

अन्वय--जैसें उदक आघविया जगा एक सेव्य (असे), तैसें तयातें तिन्ही लोक आकांक्षिती[१].

अर्थ—ज्याप्रमाणें पाणी सर्व जगाला समान सेव्य (म्ह० सेवन करण्यास योग्य वाटतें), त्याप्रमाणें त्याची तिन्ही (म्ह० स्वर्ग, मृत्यु, पाताळांतील) लोक इच्छा[१] करतात[१].

जो सबाह्यसंगु । सांडोनियां लागु ।
एकाकी असे आंगु । आंगीं सूनी ॥२०६॥

अन्वय--जो सबाह्यसंगु लागु सांडोनियां (आणि) आंगीं आंगु सूनी एकाकी असे.

अर्थ—जो अंतर्बाह्यसंगाचा संबंध टाकून (आणि) आंगांत (म्ह० ब्रह्मस्वरूपांत) आंग (म्ह० जीवात्मा) घालून एकटा असतो.

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।

अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥१९॥

जो निंदेतें नेघे । स्तुति न श्लाघे ।
आकाशा न लगे । लेपु जैसा ॥२०७॥

अन्वय--जैसा आकाशा लेपु न लगे, (तैसा) जो निंदेतें नेघे[1] (आणि) स्तुति न श्लाघे.

अर्थ--ज्याप्रमाणें आकाशाला लेप लागत नाहीं (त्याप्रमाणें) जो निंदेला घेत[1] नाहीं[1] (म्ह० निंदा मनावर घेत नाहीं) (आणि) स्तुतीला वाखाणत नाहीं (म्ह० स्तुतींत आनंद मानीत नाहीं).

तैसें निंदे आणि स्तुती । मानु करूनि एके पांती ।
विचरे प्राणवृत्ती । जनीं वनीं ॥२०८॥

अन्वय--तैसें निंदे आणि स्तुती एके पांती मानु करूनि (जो) जनीं[1] वनीं प्राणवृत्ती[2] विचरे[3].

अर्थ--त्याप्रमाणें निंदेचा आणि स्तुतीचा एकाच पंक्तींत (म्ह० वर्गांत) समावेश करून, (जो) लोकवस्तींत[1] (व) (निर्जन) अरण्यांत वायूच्या[2] वृत्तीनें[2] (म्ह० उदास वृत्तीनें) संचार[3] करतो[3].

साच लटिकें दोन्ही । बोलोनि न बोले जाहला मौनी ।
जे भोगितां उन्मनी । आरायेना ॥२०९॥

अन्वय--(जो) साच लटिकें दोन्ही बोलोनि न बोले, मौनी जाहला, जे उन्मनी भोगितां आरायेना[1].

अर्थ--(जो) खरें (व) खोटें दोन्ही बोलूनही (तो कांहींच) बोलत नाहीं, (व म्हणून तो) मौनी (म्ह० अनालापी) ठरतो, कारण (तो) उन्मनी (अवस्था) भोगतांना तृप्त[1] होत[1] नाहीं[1] (म्ह० तो सतत उन्मनी अवस्थेंत असतो).

जो यथालाभें न तोखे । अलाभें न पारुखे ।
पाउसेंवीण न सुके । समुद्रु जैसा ॥२१०॥

अन्वय--जो यथालाभें[1] न[2] तोखे[2]; (आणि) जैसा पाउसेंवीण समुद्रु न सुके (तैसा) अलाभें न[3] पारुखे[3].

अर्थ--जो पाहिजे[1] तितका[1] (म्ह० इच्छेप्रमाणें) लाभ[1] झाला[1]

असतांहि[1] संतुष्ट[2] होत[2] नाहीं[2]; (आणि) ज्याप्रमाणें पावसावांचून (म्ह० पाऊस न पडला तरी) समुद्र सुकत नाहीं (त्याप्रमाणें) (जो) अलाभानें (म्ह० मिळालें नाहीं म्हणूनहि) खिन्न[3] होत[3] नाहीं[3].

आणि वायूसि एके ठायीं । बिढार जैसें नाहीं ।
तैसा न धरीच कहीं । आश्रयो जो ॥२११॥

अन्वय---आणि जैसें वायूसि एके ठायीं बिढार नाहीं, तैसा जो कहीं आश्रयो न धरीच.

अर्थ---आणि ज्याप्रमाणें वायूला एके ठिकाणीं वसतिस्थान नसतें, त्याप्रमाणें जो कोठेंहि आसरा करीतच नाहीं.

आघवांचि आकाशस्थिती । जेवीं वायूसि नित्य वसती ।
तेवीं जगचि विश्रांति- । स्थान जया ॥२१२॥

अन्वय---जेवीं आघवांचि आकाशस्थिती[1] वायूसि नित्य वसती (असे), तेवीं जगचि जया विश्रांति-स्थान.

अर्थ---ज्याप्रमाणें सर्व आकाशाच्या[1] पोकळींत[1] वायूची नित्य वसति (असते), त्याप्रमाणें जगच ज्याचें राहण्याचें ठिकाण (होऊन राहतें).

हें विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ॥२१३॥

अन्वय---हें विश्वचि माझें घर ऐसी जयाची मती स्थिर, किंबहुना[1] (जो) आपण चराचर[2] जाहला[3].

अर्थ---हें (संपूर्ण) जगच माझें घर (आहे) अशी ज्याची बुद्धि दृढ (झालेली असते), फार[1] काय[1] सांगावें[1], (जो) स्वतःच स्थावर-जंगमात्मक[2] जग[2] (विचारदृष्ट्या) झालेला[3] असतो[3].

मग याहीवरी पार्था । माझ्या भजनीं आस्था ।
तरी तयातें मी माथां । मुकुट करीं ॥२१४॥

अन्वय---पार्था, मग याहीवरी[1] माझ्या भजनीं आस्था (असे) तरी मी तयातें माथां मुकुट[2] करीं[2].

अर्थ---अर्जुना, मग याच्याहि[1] वर[1] (म्ह० इतकें असूनहि शिवाय) (जर त्याला) माझ्या भजनामध्यें (भक्तीमध्यें) प्रेम (असेल) तर मी

त्याला (माझ्या) मस्तकावर मुकुट[२] करतों[२] (म्ह० मुगुटाप्रमाणें मी त्याला सर्वश्रेष्ठ मानतों).

उत्तमासि मस्तक । खालविजे हें काय कौतुक ।
परि मानु करिती तिन्ही लोक । पायवणिया ॥२१५॥

अन्वय--उत्तमासि[१] मस्तक खालविजे[२] हें काय कौतुक (असे), परि पायवणिया तिन्ही लोक मानु करिती.

अर्थ--चांगल्या[१] व्यक्तीपुढें[१] (अर्थात् श्रेष्ठापुढें) मान लवविली[२] जाते[२] (अर्थात् वांकवावी) हें (ह्यांत) काय आश्चर्य (आहे !), कारण (उत्तम व्यक्तीच्या) चरणतीर्थाला (म्ह० पायाच्या पाण्याला) (सुद्धां) तिन्ही (भुवनांतील) लोक मान देतात (म्ह० वंदितात अर्थात् पवित्र मानतात).

तरि श्रद्धावस्तूसि आदरु-। करिता जाणिजे प्रकारु ।
जरी होय श्रीगुरु । सदाशिवु ॥२१६॥

अन्वय--जरी सदाशिवु श्रीगुरु होय तरि श्रद्धावस्तूसि[१] आदरु करिता प्रकारु जाणिजे[२].

अर्थ--जर श्रीशंकर गुरु होतील तरच श्रद्धेय[१] वस्तूचा[१] [म्ह० आपल्या श्रद्धेचा (भक्तीचा) विषय[१] असलेल्या[१] व्यक्तीचा[१]] आदर (व्यक्त) करण्याची रीत कळून[२] येईल[२] (शब्दशः --कळण्यांत येतो).

परि हें असो आतां । महेशातें वानितां ।
आत्मस्तुति होतां । संचारु असे ॥ २१७ ॥

अन्वय--परि हें आतां असो[१], महेशातें वानितां[२] आत्मस्तुति[३] होतां संचारु असे.

अर्थ--परंतु हें आतां राहूं[१] दे[१]; (कारण) श्रीशंकराचें वर्णन[२] करीत[२] असतांना[२] माझी[३] स्वतःची[३] स्तुति[३] होण्याचा दोष (उत्पन्न) होतो.

ययालागीं हें नोहे । म्हणितलें रमानाहें ।
अर्जुना मी वाहें । शिरीं तयातें॥ २१८ ॥

अन्वय--ययालागीं हें नोहे रमानाहें म्हणितलें, अर्जुना मी तयातें शिरीं वाहें[१].

अर्थ—या कारणास्तव हें (योग्य) नाहीं (असें) रमापतीनें (अर्थात् श्रीकृष्णानें) म्हटलें, " अर्जुना, मी त्याला डोक्यावर धारण करितों[१]."

जे पुरुषार्थसिद्धि चौथी । घेऊनि आपुलिया हातीं ।
रिगाला भक्तिपंथीं । जगा देतु ॥ २१९ ॥

अन्वय—जे चौथी पुरुषार्थसिद्धि[१] आपुलिया हातीं घेऊनि जगा भक्तिपंथीं देतु रिगाला[२].

अर्थ—कारण (तो भक्त) चवथ्या पुरुषार्थांची[१] पूर्णता[१] (म्ह० मोक्ष) आपल्या हातांत घेऊन (तो मोक्ष) जगाला भक्तिमार्गानें वांटीत जात[२] असतो[२] (शब्दशः—वांटीत निघाला).

कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडीबांधी करी ।
कीं जळाचिये परी । तळवटु घे ॥ २२० ॥

अन्वय—कैवल्याचा अधिकारी, मोक्षाची सोडीबांधी करी, कीं जळाचिये[१] परी[१] तळवटु घे.

अर्थ—(तो) मोक्षाचा अधिकारी (आहे) (अर्थात् मोक्षाचा नियामक असल्यामुळें) मोक्षाची सोड—बांध (अर्थात् मोक्ष देणें, न देणें) (हें आपल्या इच्छेप्रमाणें तो) करतो; तरीपण पाण्याप्रमाणें[१] (म्ह० पाण्याची रीत अनुसरून) अधोभाग (अर्थात् खालची जागा) स्वीकारतो (म्ह० नम्रता घेतो अर्थात् नम्रपणानें वागतो).

म्हणोनि गा नमस्कारूं । तयातें आम्ही माथां मुकुट करूं ।
तयाची टांच धरूं । हृदयीं आम्ही ॥ २२१ ॥

अन्वय—गा (अर्जुना) म्हणोनि आम्ही तयातें नमस्कारू[१] (तयातें) माथां मुकुट[२] करूं[२]; तयाची टांच[३] आम्ही हृदयीं धरूं[३].

अर्थ—अरे (अर्जुना) म्हणून आम्ही त्याला नमस्कार[१] करूं[१] (अथवा करतों), (त्याला) डोक्यावर मुगुटासारखा धारण[२] करूं[२] (अथवा करतों), (आणि) त्याच्या पायाचें[३] चिन्ह[३] आम्ही हृदयावर धारण[४] करूं[४] (अथवा करतों).

तयाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणी ।
तयाची कीर्ति श्रवणीं । आम्ही लेऊं ॥ २२२ ॥

अन्वय—तयाचिया गुणांचीं लेणीं आपुलिये वाणी लेववूं (आणि) आम्ही तयाची कीर्ति श्रवणीं लेऊं.

अर्थ—त्याच्या गुणांचे दागिने आमच्या वाचेला घालूं (आणि) आम्ही त्याची कीर्ति (हा दागिना) कानांत घालूं.

तो पहावा हे डोहळे । म्हणोनि अचक्षूसी मज डोळे ।
हातींचेनि लीलाकमळें । पुजूं तयातें ॥ २२३ ॥

अन्वय—तो पहावा हे डोहळे म्हणोनि अचक्षूसी मज डोळे (असती), हातींचेनि लीलाकमळें[1] तयातें पुजूं[2].

अर्थ— तो पाहावा ही इच्छा असल्यामुळें नेत्रहीनाला मला (हे) डोळे (आहेत), (व) हातांत विलासाकरितां[1] घेतलेल्या[1] कमळानें[1] (मी) त्याची पूजा[2] करतों[2].

दोंवरी दोनी । भुजा आलों घेउनी ।
आलिंगावयालागुनी । तयाचें आंग ॥ २२४ ॥

अन्वय—तयाचें आंग आलिंगावयालागुनी[1] दोंवरी दोनी भुजा घेउनी आलों.

अर्थ—त्याच्या शरीराला आलिंगन[1] देण्याकरितांच[1] दोहोंवर (आणखी) दोन बाहू घेऊन (मी) अवतरलों (आहें).

तया संगाचेनि सुरवाडें । मज विदेहा देह धरणें घडे ।
किंबहुना आवडे । निरुपमु ॥ २२५ ॥

अन्वय—विदेहा मज तया संगाचेनि सुरवाडें देह धरणें[1] घडे; किंबहुना[2] (तो) निरुपमु आवडे.

अर्थ—देहरहिताला मला त्याच्या संगतीच्या सुखासाठीं शरीर धारण[1] करावें[1] लागतें; फार[2] काय[2] सांगावें[2] (तो मला) अद्वितीय वाटतो.

तेणेंसीं आम्हां मैत्र । एथ कायसें विचित्र ।
परि तयाचें चरित्र । ऐकती जे ॥ २२६ ॥

अन्वय—आम्हां तेणेंसीं मैत्र, एथ कायसें विचित्र परि जे तयाचें चरित्र ऐकती—

अर्थ—आमची त्याच्याशीं मैत्री (असते) यांत कसलें आश्चर्य ? पण जे त्याचें चरित्र ऐकतात (ते)—

तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें ।
जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ॥ २२७ ॥

अन्वय—जे भक्तचरित्रातें प्रशंसिती[1], तेही प्राणापरौते आवडती, हें निरुतें (असे).

अर्थ—(व) जे भक्तचरित्राचें वर्णन[1] करतात[1], तेसुद्धां (मला) प्राणापलीकडे आवडतात, हें निश्चित (आहे).

जो हा अर्जुना साद्यंत । सांगितला प्रस्तुत ।
भक्तियोगु समस्त । योगरूप ॥ २२८ ॥

अन्वय—अर्जुना, जो हा प्रस्तुत साद्यंत[1] भक्तियोगु सांगितला, (तो) समस्त योगरूप (असे).

